
४ मे १९६८ । चालीस पैसे

# माणूस

परार्धलक्ष्मी पडली भूमी, तरि काखेला अमुच्या झोळी
स्वातंत्र्याच्या पारावरतीं अमुच्या चारित्र्याची होळी



# विद्यार्थी परिषद शिबिरे

गेल्या वर्षी विद्यार्थी परिषदेच्या नागपूर शाखेने मराठवाड्यातील आदिवासी जीवनाशी ओळख करून घेण्याचा पहिला प्रयोग केला. हा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला. मा. वसंतराव नाईक यांनी देखील शिबिरास भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याच वेळी महाराष्ट्रातील पन्नास विद्यार्थी कार्यकर्त्यांचे शिबिर आशागड या आदिवासी भागात भरले. त्याच्या यशाने उत्साहित होऊन महाराष्ट्रात यंदा नागपूर विभागाचे बस्तरला, मराठवाडा विभागाचे औरंगाबादजवळ वेरूळ येथे, नाशिक-जळगाव विभागाचे सातपुड्यात धुळ्याजवळ, पुणे-मुंबई विभागाचे डहाणू तालुक्यात तळासरीला व शिवाजी विद्यापीठ विभागाचे पुनर्वसन योजनेखाली कोयनेला अशी शिबिरे होणार आहेत.

या शिबिरांची पाच ठळक वैशिष्ट्ये असतील.

१ : आदिवासी जीवनाचा अभ्यास (Survey). त्याकरिता शिबिरातील विद्यार्थ्यांचे गट या भागातील खेड्यांतून हिंडतील, आदिवासींना त्यांच्या घरांत भेटतील. प्रश्नावली (Questionair) च्या साहाय्याने माहिती गोळा करतील व त्यावर आधारित तेथील जीवनाचे चित्र व निष्कर्ष सादर करतील. अशा महाराष्ट्रातील निरनिराळ्या शिबिरांतील निष्कर्ष व माहितीवरून आदिवासींच्या जीवनाची समग्र कल्पना देणारी पुस्तिका नंतर तयार करण्यात येईल.

२ : निरनिराळ्या प्रश्नांची परिसंवाद वा अन्य रूपाने चर्चा करण्यात येईल. त्याकरिता विचारवंतांचे मार्गदर्शन लाभेल.

३ : विशेषतः विद्यार्थ्यांशी संबंधित विविध शैक्षणिक प्रश्नांवर गंभीरपणे विचार करून त्यासंबंधी समंजस दृष्टिकोन प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

४ : श्रमदानाने काही छोटे मोठे निर्मितीचे काम करण्यात येईल.

५ : हे शिबिर व इतर अनेक प्रकल्प चालविणाऱ्या विद्यार्थी परिषदेच्या कामाचा परिचय व संघटनात्मक बाबींचा विचार करण्यात येईल.

आज लहानमोठ्या शहरांतील आम्हा विद्यार्थ्यांना खरे म्हणजे हे आव्हान आहे. आमच्यांतील अमर्याद उत्साहाला वळण लावणाऱ्या, देशबांधवांचे जीवन समजून सांगणाऱ्या, समाज प्रेमाचे संस्कार करणाऱ्या ह्या नव्या क्षितिजांच्या हाकेला आम्ही साथ देणार काय ?

**— अजित पटवर्धन**

[ शिबिरविषयक चौकशी— संध्याकाळी ६।। ते ८ : विद्यार्थी परिषद, पुणे शाखेचे कार्यालय— १५२५ सदाशिव पेठ, मंगल भुवन, पुणे २ : पुणे विभाग शिबिर काल — १३ मे ते १९ मे. इतर शहरांतील परिषदेच्या कार्यालयात शिबिराची माहिती मिळू शकेल. तसेच इतर ठिकाणच्या कार्यालयाचे पत्ते पुण्याच्या कार्यालयात मिळू शकतील. ]

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : एकूणपन्नासावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## प्रतिमा

मुखपृष्ठावरील पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे व्यंगचित्र ब्रिटनमधील प्रचंड खपाच्या 'डेली मिरर'ने नुकतेच प्रसिद्ध केलेले आहे.

आमची परदेशातील प्रतिमा काय आहे हे एवढ्यावरून समजावे. अशी शेकडो चित्रे, वक्तव्ये तिकडे प्रसिद्ध होत असतात आणि इकडे त्याची आम्हाला काही लाज, शरमही वाटत नाही.

ही वाटावी, आमच्या काखेला अडकवलेली भिकेची झोळी आम्ही झुगारून द्यावी, आमची देशातली व देशाबाहेरील प्रतिमा काही वेगळी असावी यासाठी 'श्रीकैलास ते सिंधुसागर' हे अन्नसंचलन योजले होते. या अंकात संचलनाचा छायाचित्रात्मक आलेख पूर्ण होत आहे.

ज्या व्यक्ती आणि संस्था यांनी हे संचलन यशस्वी व्हावे यासाठी प्रयत्न केले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

हे ऋण कदाचित् आणखीही वाढल. कारण 'परार्धलक्ष्मी भूमी' आपली सर्वांचीच वाट पाहत आहे.

—श्री. ग. माजगावकर

[मुखपृष्ठावरील कवितेच्या ओळी श्री. बा. भ. बोरकर यांच्या 'असलें हें फळ केंवि तपाला' या कवितेतील आहेत.]

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## वेल्होळीनंतरचा मुक्काम : वाडीवरे

स्वागत थाटात. व्यवस्था उत्तम. पण दिवस चमत्कारिक गेला. सारे-जण आळसावलेले होते. माझा चष्मा फुटला. नाशिककडून नवीन चौकट येईपर्यंत झोप. मोकाशींची डायरी नेहमीप्रमाणे हरवली, नेहमी-प्रमाणे तासाभराच्या उस्कटापास्कटीनंतर सापडलीही. छायाचित्रकार मोरे नेहमीप्रमाणे दमले–भागलेले. आजचे अंतर काही कमी नव्हते. शिवाय उन्हाची बाधाही सर्वांना जाणवली. विशेष म्हणजे विनायकराव पाटीलही निरुत्साही. उत्साहमूर्ती फक्त जोशीबुवा. त्यांची आंघोळ, व्यायाम, कपडे धुणे वगैरे व्यवस्थित चालू होते. शिवाय कोणाचे अंग दाबून देतील, कोणाच्या हातापायांना मालीश करून देतील.

रात्री गावकऱ्यांनी ‘ सामिष ’ भोजनाचा बेत करून मोरे-मोकाशी-जोशी-पाटील या चौकडीला खूष करून टाकले. माझा उपास



वाडीवऱ्याच्या संध्याकाळच्या सभेत

**श्री. मूळचंद गोठी**

सभापती, इगतपुरी तालुका, यांचेच भाषण फक्त चांगले झाले.

वाटपव्यवस्था सुधारली तर धान्य तूट नाही हे यांचे ठाम मत.

—शेतीचा प्रत्यक्ष अनुभव. खूप माहिती. धडाडीचे कार्यकर्ते म्हणून या भागात फार लौकिक. आणि दराराही.

राजकारणाच्या धबडग्यातही गझल-कव्वाल्यांचा शौक समजूनउमजून बाळगण्याइतकी रसिकता अजूनही शाबूत ठेवली आहे ही यांची आणखी एक विशेषता.



श्री. मूळचंदशेठ

वाडीवरे ते घोटी. अंतर बारा मैल. रात्रीच्या चांदण्यातच हा कंटाळवाणा प्रवास आटोपला. घोटीला दिवसभर आराम. संध्याकाळी घोटीच्या पाणीपुरवठा योजनेची माहिती श्री. मूळचंद गोठी यांनी जागेवर नेऊनच समक्ष करून दिली.

रात्रीच्या सभेचे प्रमुख वक्ते—
श्री. बापूसाहेब उपाध्ये, नाशिक.

'यापुढे हे सारे असेच चालणार, अशी निराशेची भावना आज सर्वत्र पसरली आहे. हे चालणार नाही, चालू दिले जाणार नाही हा संचलनाचा सूर आशादायक वाटतो'— श्री. उपाध्ये.

व्यासपीठावर श्री. बाबुशेठ सारडा.

'देशदूत'चे संपादक श्री. शशीकांत टेंबे हेही या मंडळींच्या समवेत घोटीच्या सभेला उपस्थित होते.




श्री. बापूसाहेब



इगतपुरीच्या वेशीवर–
नगराध्यक्ष श्री. गोपीनाथ जाधव, उत्साही सामाजिक कार्यकर्ते श्री. बोरोस्ते, दत्तू चांदवडकर व मुरलीधर चांदवडकर, 'बॉम्बे लॉज'चे मालक सूरजमल चांडक....

आचार्य भिसे यांच्यासमवेत



इगतपुरीचा घाट ओलांडला आणि ठाणे जिल्ह्याच्या सरहद्दीवरच आचार्य भिसे, श्री. केतकर, श्री. महाजन, श्री. बर्वे आणि इतर काही सर्वोदयी कार्यकर्ते संचलनात सहभागी झाले. आचार्यांची सेवा, अधिकार आणि वय पाहता त्यांनी आपणहून येणे हा संचलनसैनिकांना फार मोठा बहूमान वाटला.

कसाऱ्याला दुपारी आचार्यांनी संचलनासंबंधी आपले विचार व्यक्त केले. तीन तपांचा अनुभव या विचारांमागे उभा होता. विशेषत: अनेक आदिवासी गावांतून आचार्यांच्या प्रेरणेने, सर्वोदयी कार्यकर्त्यांनी चालू केलेली ग्रामकोठारांची योजना विशेष अभ्यासनीय वाटली.

अशाच स्वरूपाची योजना संचलन सुरू होण्यापूर्वी श्री. अच्युतराव पटवर्धन यांनीही मला सांगितलेली होती.

कसारा, खर्डी, आटगाव आटपून संचलन शहापुरात पोचले.

मिरवणुकीपूर्वी पंचायत समिती, शहापूर यांतर्फे सभापती श्री जागरे यांनी संचलन सैनिकांचे स्वागत केले.

मिरवणूक संयोजन : श्री. बाबा परदेशी व श्री. गोपालजी ठक्कर.





पां. सी. देशमुख, सभाध्यक्ष



वि. ग. कानिटकर, प्रास्ताविक



## शहापूर सभा

काही महिलांची अनावर झोप सोडली तर अनेक वक्ते असूनही ही सभा चांगली रंगली असे शहापूरकर मंडळी म्हणत होती.


या सभेसाठी पुण्याहून श्री. दादासाहेब कुलकर्णी, श्री. रंगा मराठे, सौ. निर्मला पुरंदरे ही मंडळी उपस्थित होती.




शाळाप्रमुख शेवडे



मराठीचे अध्यापक, स. गं. मालशे





शहापूरच्या दोन दिवसांतील मुक्कामातील हा आणखी एक कार्यक्रम.

## गोठेघरवाफा येथील आदिवासी आश्रमशाळेला भेट

आश्रम चालक : श्री. महाजनगुरुजी

'काश्मीर झक मारतं. इथेच येऊन राहाव'– छायाचित्रकार मोरे यांनी आश्रमात काही काळ काढल्यावर सहज हे उद्‌गार काढले.

'सगळेच असे म्हणतात. येत मात्र कुणी नाही.'– महाजनगुरुजींनी आपली व्यथा सांगितली.

कोणी येवो न येवो, महाजनगुरूजींची व त्यांच्या सहकाऱ्यांची ही आदिवासीसेवा ईश्वरचरणी रुजू आहे.

आदिवासी मुलामुलींनी केलेले सांघिक कवायतीचे प्रयोग फारच आकर्षक होते. आश्रमातील शिस्त आणि स्वच्छता वाखाण्यासारखी होती.

खर्डी मुक्कामी संचलनात सामील झालेले नारायणगावचे श्रीकांत सबनीस यांचा हा शेवटचा कार्यक्रम होता. चार दिवस त्यांनी आपल्या माहितीपूर्ण आणि सरळसुबोध व्याख्यानांनी असंख्य श्रोत्यांची मने आकर्षित केली होती. [ डावीकडून चित्रात– श्री. महाजन गुरूजी, श्रीकांत सबनीस, श्री. ग. मा., विनायकराव पाटील, आचार्य भिसे, दादा घामणसकर ]



शहापूरनंतर संचलन एका अर्थाने विस्कटलेच. पहिल्या दिवसापासून कायम असलेला सैनिक मी एकटाच उरलो.

मोरे ठाण्याचे. तेव्हा संचलनाची ठाण्यातील Arrangement करण्याकरिता ते पुढे गेले.

विनायकराव पाटलांच्या पायाला दुखापत झाल्यान त्यांनी वाहनाचा आश्रय घेतला.

कल्याण जवळ आले म्हणून मोकाशी पुढे सटकले. ते स्वतःला अजूनही 'कल्याणकर' समजतात. बालपण त्यांचे इकडच्या भागात गेले, एवढाच त्यांचा आणि कोकणचा संबंध. तरी 'आमचे कोकण, आमच्या कोकणात' हा त्यांचा पहिल्या दिवसापासूनचा जप काही कधी संपला नाही.

एरव्ही अव्यवस्थित वाटणारे मोकाशी कामाला लागले म्हणजे वाघ हं !

**सकाळची मिरवणूक......**


दुपारची डॉक्टर मोकाशी यांच्याकडची 'पंगत'

रात्रीची 'फुटपाथ पार्लमेंट'च्या वतीने योजलेली सभा......

ही सगळी 'मोकाशी'ची योजकता.

**'फुटपाथ पार्लमेंट'**

हे कल्याणमधील एक और प्रकरण आहे. याविषयी पुन्हा केव्हा तरी



**डोंबिवली :**
**नगराध्यक्ष श्री. कमलाकर देसाई**
**व इतर नगरपिते यांच्यासमवेत**
...

येथील नगरपालिकेने अनेक सुधारणा केल्या असतील-नसतील. पण एका सुधारणेचे मात्र सर्व ठिकाणी अवश्य अनुकरण व्हायला हवे.

यथील हरिजन वसाहत केवळ पाहण्यासारखीच नाही, जाऊन राहण्यासारखीही आहे. इथ स्वच्छता आहे. सौजन्य आहे आणि मुख्य म्हणजे समाधानही आहे. हरिजनांच्या वस्त्या दिवसाढवळ्या जाळून टाकण्याचे प्रकार ज्या देशात आजही चालू आहेत तेथे असे काही पाहिले की भवितव्याविषयी आशाही वाटू लागते.



रात्रीच्या सभेत प्रमुख वक्ते,
प्रसिद्ध साहित्यिक
**श्री. पु. भा. भावे**
डोंबिवलीचे आणखी एक साहित्यिक
श्री. शं. ना. नवरे
यांनीही शेती-शतकरी व अन्नस्वतंत्रता
याविषयी आपले काही अनुभव
सभेत सांगितले.
प्रा. नरेंद्र रामकृष्ण साखळकर
यांनी अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून
हा विषय मांडला.

संचलनातील एका दिवसातील
सर्वांत अधिक चाल.
डोंबिवली ते ठाणे.
सुमारे पंधरा मल.
वेळ : सकाळी सहा ते दुपारी एक.



दुपारी चारला पोचू या अंदाजाने
केलेली सर्व व्यवस्था कोलमडली.
छायाचित्रकार मोरे यांची कोण
धांदल ! गडबड !

तरीही सगळा पाहुणचार यथास्थित
झाला. एकच उणीव. त्यांचे जोडीदार
मोकाशी कल्याणहून येऊ शकले
नाहीत. कल्याणपासूनच त्यांची
तब्येत जरा बिघडायला सुरुवात
झाली होती.
रात्रीच्या सभेचे अध्यक्षस्थान—
ठाणे नगरपालिकाध्यक्ष
**श्री. मराठे**
यांनी स्वीकारले होते.




गुढी पाडवा दर वर्षी येतो. आलाच पाहिजे. एक वर्ष संपून दुसरे सुरू झाल्याची ती नांदी. गुढ्यातोरणे उभारून, पक्वान्ने खाऊन तो आपण साजरा करतो. पक्वान्ने कसली ? परदेशांतून आयात केलेल्या धान्यापासून बनविलेली. देश स्वतंत्र झाला. राजकीय स्वातंत्र्य मिळाले. परंतु हे अन्नपरावलंबन मात्र चालूच आहे. या वर्षीचा गुढी पाडवा निराळ्या पद्धतीने साजरा करू या. गुढ्या उभारू. पण या नव्या निर्धाराच्या. 'परदेशांतून आयात केलेले धान्य नको' हाच तो निर्धार. 'एक वेळ भूकबळी होऊ, पण भीकबळी होणं नाही,' हे एक आवाजात आपल्या सरकारला सांगू या.


हा संदेश घेऊन 'माणूस'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर, कैलास लेण्याहून निघाले आहेत. समर्थ राष्ट्रीयत्वासाठी, २६ जानेवारी १९६८ रोजी माजगावकरांनी हे संचलन सुरू केले आहे. जिकिरीचा एकाकी पायी प्रवास सुरू केला आहे. पण ते एकटे नाहीत. आपल्या सर्वांची नैतिक शक्ती त्यांच्या मागे उभी आहे. याची प्रचिती त्यांना द्यायची आहे.

गुढी पाडव्याला सकाळी ९ वाजता माजगावकर लालबहादूर शास्त्री मार्गाने बृहन्मुंबईत प्रवेश करतील. मुलुंड चेक नाक्यावर आपण त्यांचे स्वागत करू या. तेथून त्यांच्याबरोबर संचलन सुरू करून त्यांना महाराष्ट्र सेवा संघाच्या सभागृहात आणू या. येथे सभा होऊन त्यांच्या या संचलनाची समाप्ती होईल.

डॉ. माधव खांडेकर
अध्यक्ष, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड.


मुलुंड चेक नाक्यावर महाराष्ट्र सेवा संघाचे कार्यकर्ते
व प्रमुख नागरिक यांच्या समवेत....

रविवार दिनांक ३१ मार्च.
अपोलो बंदर, भारत प्रवेशद्वारानजीक
सिंधूसागर संचारासाठी जमलेल्या
उपस्थितांत
चित्रपटनिर्माते के. असीफ.



आणि

विजय तेंडुलकर, रमेश तेंडुलकर, वि. ग. कानिटकर, यदुनाथ थत्ते, मधू रावकर, दि. बा. मोकाशी, विद्याधर पुंडलिक, सौ. निर्मला पुरंदरे.







'हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व' या विस्मृत ग्रंथाचे लेखक, इतिहासाभ्यासक श्री. जयवंत जोगळेकर यंत्रनौकेत संचलनाविषयी आपले विचार व्यक्त करीत असताना...


पहिल्या दिवसापासून संचलनासोबत असलेले छायाचित्रकार श्री. वसंत मोरे संचलनाची शेवटशेवटची छायाचित्रे टिपत असताना...



**सेतू बांधा रे सागरी ! सेतू बांधा रे सागरी...**

पत्रकार परिषदेचे अध्यक्ष श्री. कांतीलाल गुजराथी, 'युद्धनेतृत्व'कार दि. वि. गोखले सुधीर फडके या सर्वांनी संचलन सैनिकांना निरोप दिला, पण विचारणाही केली— —-पुढे काय !

**खरंच, पुढे काय !**





## हे सेतु बंधन....

स्वातंत्र्याचे स्वदेशीकरण
स्वदेशाचे एकीकरण
यासाठी
श्री कैलास ते सिंधूसागर

निघालेले 'अन्नस्वतंत्रता संचलन', वर्ष प्रतिपदेला-शुक्रवार दि. २९ मार्चला—मुंबईला पोचले आणि रविवार दि. ३१ मार्चला अपोलो बंदरावर, भारत प्रवेश द्वाराच्या साक्षीने त्याची समारंभपूर्वक सांगताही झाली. तीन यंत्रनौकातून सुमारे दीडशे मंडळी घारापुरीच्या दिशेने समुद्रात मैलभर आत गेली आणि त्यांनी स्वदेशी गव्हाचे चार दाणे सिंधुसागराला भक्तिभावाने अर्पण केले.

या अर्पणामागची भावना स्पष्ट होती. भारत अन्नधान्याबाबत केवळ स्वावलंबीच होऊ इच्छितो, शकतो असे नाही; केवळ अमेरिकेची अन्नधान्याची मदत बंद व्हावी एवढेच नाही; तर लवकरात लवकर इतर गरजवंतांना अन्न निर्यात करू शकणारा एक पुरुषार्थी देश म्हणून भारताची प्रतिमा साकार व्हावी, आपला देश केवळ 'घेणारा' देश न राहता देणाऱ्यांच्या मालिकेत जाऊन बसावा अशी जमलेल्या अनामिकांची मनीषा होती.

'गेल्या हजार वर्षातील सततच्या पराभवामुळे आपल्यात काही स्वाभाविक विकृती निर्माण झालेल्या आहेत. चर्चिलने या विकृतींना 'Diseases of Defeat' म्हटले आहे. हा पराभूतांना जडणारा रोग आपण समूळ नाहीसा केला पाहिजे. यासाठी सर्व क्षेत्रांत निर्धारपूर्वक स्वावलंबनाची कास धरणे हाच उपाय आहे. हा समारंभ अशा स्वावलंबी सामाजिक क्रांतीचा कदाचित आरंभही ठरू शकेल. कारण इतिहासात क्रांत्या अनामिकांकडून अशाच एकाएकी सुरू होत असतात. बोस्टनला काही खलाशांनी समुद्रात चहाची खोकी फेकून दिली आणि अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाला आरंभ झाला...' या समारंभासाठी उपस्थित असलेले इतिहासाचे क अभ्यासक श्री. जोगळेकर यांनी यंत्रनौकातील अनौपचारिक सभेत हा प्रसंगस्फूर्त विचार श्रोत्यांसमोर ठेवला.

त्या आधी सुधीर फडके यांनी 'सेतू बांधा रे सागरी' हे गीतरामायणातील प्रसिद्ध समूहगीत म्हटले व 'सीतावर रामचंद्र की जय' या घृपदघोषाने श्रोत्यांनी त्यांना साथही दिली.

तीनही यंत्रनौकातून घोषणा दिल्या जात होत्या....

**मदत झुगारा, भारत उभारा**
**आमचे आम्ही, जगाचे स्वामी**
**भारत माता की जय**

४ मे १९६८

तासाभराच्या सागर संचारानंतर हा कार्यक्रम संपला. 'श्री कैलास ते सिंधूसागर' या कार्यक्रमाची सांगता अशी झाली.

महामुंबईच्या वेशीवर मुलुंडच्या नागरिकांनी अन्नसंचलनाचे उत्साहाने स्वागत केले होते. या प्रसंगी उत्तरादाखल केलेल्या भाषणात मी म्हटले होते–

'राजकीय दृष्टचा आपण स्वतंत्र आहोत. पण गरीब असल्यामुळे प्रगत व संपन्न राष्ट्रांचे सावकारी पाश आपल्या मानेभोवती आवळले जात आहेत. या आर्थिक गुलामगिरीविरुद्ध आपण जोपर्यंत उठाव करीत नाही तोपर्यंत आपल्या राजकीय स्वातंत्र्यालाही फारसा अर्थ नाही. पन्नास-साठ वर्षांपूर्वीसारखीच परिस्थिती आज पुन्हा निर्माण होऊ पाहत आहे. इंग्रज जावा असे सर्वांनाच वाटत होते. पण अर्जविनंत्या करून तो जाईल, शिष्टमंडळे त्याच्या दाराशी घेऊन जाऊन त्याचे मतपरिवर्तन करता यईल असे मानणारा मवाळ पक्ष होता. उलट तेल्यातांबोळ्यात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केल्याशिवाय तो जाणार नाही, येथील सर्वसामान्य जनतेला यासाठी लढावे लागेल असे प्रतिपादन करणारा जहालपक्ष होता व अखेरीला याच स्वदेशी–स्वावलंबनाच्या मार्गाने देशाच्या राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न सुटला. आज प्रश्न आर्थिक स्वातंत्र्याचा आहे. हेही स्वातंत्र्य प्रगत परक्या देशांच्या मदतीने, त्यांच्या मानवहित-बुद्धीवर व उदारभावनांवर विसंबून आपल्याला लाभणार आहे असे मानणारा एक मोठा वर्ग आपल्याकडे आज निर्माण झालेला आहे. शासनावरही याच मताचा पगडा आहे. या अनुनयवादी विचारसरणीला आपण आता रामराम ठोकला पाहिजे, स्वतःच्या विकासासाठी सर्व क्षेत्रात स्वावलंबनाची कास धरली पाहिजे, नाहीतर नवीन आर्थिक आक्रमणाला बळी पडण्याची पाळी या देशावर येईल ही या संचलनापाठीमागची मुख्य भूमिका आहे. संचलन आज येथे पोचले, म्हणजे थांबले, संपले असे नाही. आर्थिक गुलामगिरीविरुद्धच्या लढ्याची ही केवळ सुरुवात आहे.'

सुरुवात समजली, ठीक आहे, पुढे काय, हा प्रश्न पहिल्या दिवसापासून विचारला जात होता. शेवटीही अनेकांनी तो उपस्थित केला. फार पुढचा नाही, पण उद्या-परवाचा, वर्षा-सहा महिन्याचा कार्यक्रम आखलेला आहे. त्याची रूपरेषा अशी सांगता येईल–

१ : 'परकीय अन्नमदत ताबडतोब बंद व्हावी' अशा अर्थाचे ठराव सर्व ठिकाणच्या ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, निरनिराळे राजकीय पक्ष, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, मजूर संघटना, विद्यार्थी संघटना यांनी संमत करून शासनाकडे पाठविणे.

वातावरण निर्मितीला अशा ठरावांचा उपयोग होईल अशी कल्पना आहे.

अशा ठरावांची एक प्रत अन्नसंचलनाकडे पाठविली जावी. एकसूत्री प्रचाराच्या दृष्टीने हे आवश्यक आहे.

२. संचलन वेरूळ ते मुंबई मार्गावर असताना नासिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील ११ गावांनी 'परान्नमुक्ती'चे निर्णय घेतलेले आहेत. १: येत्या दोन वर्षात गावात परकीय अन्नधान्याचा एक कणही येऊ न देणे. २: गावातील अन्नधान्याची गरज परस्परांच्या सहकार्याने पूर्ण करणे. ३: सरकारी धान्यवसूल नियमानुसार भरणे—अशी या निर्णयामागील साधारण भूमिका आहे. जिथे जिथे स्थानिक परिस्थिती अनुकूल असेल तेथे तेथे अशा गावांची, विभागांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न करणे. यासाठी शासनाचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते, विचारवंत या सर्वांच्या संयुक्त बैठका आयोजित करणे.

३. वरील दोन आंदोलनात्मक कार्यक्रमांना शक्य तेथे विधायक उत्पादनवाढीच्या कार्याची जोड देणे. अनेक ठिकाणी शासकीय दिरंगाई, दीर्घसूत्री कारभार, लाचलुचपत, लोकांची उदासीनता, उधळपट्टी व उपेक्षा, पक्षीय स्वार्थ व गटबाजी यामुळे अन्नोत्पादनाला व न्याय्य वितरणाला खीळ बसलेली असते. अशा मोक्याच्या जागी अन्नमोहिमा संघटित करणे. या मोहिमांचे स्वरूप स्थानिक परिस्थितीप्रमाणे अर्थात वेगवेगळे राहील.

हाती घेतलेल्या पहिल्या अन्नमोहिमेचे स्वरूप उदाहरणार्थ असे आहे.

अन्नसंचलनाचा मुक्काम ठाणे जिल्ह्यातील आटगाव येथे असताना पाण्याचा एक मोठा हौद आज कित्येक वर्षे तेथे निरुपयोगी पडून आहे, असे गावकऱ्यांनी संचलनसैनिकांना सांगितले. शासकीय दिरंगाई व दुर्लक्ष हे कारण. वीस–पचवीस वर्षांपूर्वी कल्याण–कसारा या रेल्वे–मार्गावर कोळशाची इंजिने धावत असल्याने आटगावला इंजिनांना पाणी घेण्यासाठी हा हौद रेल्वेने बांधून ठेवला होता. आता या रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण झाल्याने या हौदाची रेल्वेला गरज उरलेली नाही. हौद मोठा आहे व जुन्या गावकऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे सुमारे चाळीस–पन्नास एकर


स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

जमिनीला तरी यामुळे सहज पाणीपुरवठा होऊ शकेल. शिवाय आटगावचा व आसपासच्या दोन–तीन गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सुटू शकेल. इतकी वर्षे हा हौद उपयोगात न आल्याने आता त्यात बराच गाळ साचलेला आहे व गावाच्या सुरक्षिततेलाही त्यामुळे धोका पोचत आहे. गुरे आत पडून मेलेली आहेत, माणसेही दगावलेली आहेत असे म्हणतात. हा हौद आटगाव ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिला तर यातील गाळ उपसून, थोडी बांधबंदिस्ती करून या पाण्याचा पिण्यासाठी व शेतीच्या कामासाठीही उपयोग करण्याचा गावकऱ्यांचा विचार आहे त्या दृष्टीने थोडी हालचाल व पत्रव्यवहारही आटगाव पंचायतीने केलेला आहे.

दोन वर्षांपूर्वी, १९६६ च्या मध्याला पंचायतीने महाराष्ट्राचे शेतकीमंत्री श्री. पी. के. सावंत यांना या हौदाबाबत एक पत्र लिहिले. ' रेल्वे अधिकाऱ्यांकडे पत्र-व्यवहार करावा ' अशी शेतकी खात्याकडून या पत्राची बोळवण झाली.

आटगावच्या गावकऱ्यांकडून असेही कळले, की त्या भागातील खासदार श्री. सोनू भाऊ बसवंत यांच्या कानावर हे हौदप्रकरण ग्रामपंचायत सदस्यांनी घातले होते व श्री. बसवंत यांच्या खटपटीमुळे सेंट्रल रेल्वेचे दोन अधिकारी आटगावला येऊन हौदाची पाहणीही करून गेले होते.

गावकऱ्यांची उदासीनता येथे आड आली. त्यांनी हे प्रकरण येथेच अर्धवट सोडले. रेल्वे खात्याकडूनही पाहणीनंतरचा निष्कर्ष पंचायतीला कळविण्यात आला नाही. अनधिकृतपणे गावकऱ्यांना फक्त एवढेच सांगण्यात आले होते, की या हौदाचा निदान रेल्वेला तरी आता काहीही उपयोग नाही.

रेल्वेला उपयोग नसेल तर गावकऱ्यांनी हे पाणी वापरायचे आता निश्चित केलेले आहे. कोणाच्याही परवानगीची वा मदतीची वाट न पाहता हौदातला गाळ श्रमदानाने उपसला जाईल, अवश्य ती डागडुजी करून गावकरी हे आज निव्वळ वाया जाणारे पाणी पिण्यासाठी व शेतीकामासाठी उपयोगात आणतील.

तरीही एक आठवड्याची पूर्वसूचना केंद्रीय व प्रांतीय शासनाला द्यावी, असे सर्वानुमते ठरले आहे. या अवधीत अवश्य ती कायदेशीर परवानगी आली तर ठीकच. नाही आली तरी काम चालू करण्याचा गावकऱ्यांचा निर्धार आहे.

जनतेने कायदा हाती घेऊ नये हे जितके खरे तितकेच शासनानेही जनतेला आपले उंबरठे झिजवायला लावू नये हे खरे आहे. शासनाने गतीचा कायदा पाळावा म्हणजे लोकही कायद्याची प्रतिष्ठा राखतील.

एकीकडे अन्नप्रश्न हा युद्धपातळीवरून सोडवला पाहिजे, दोन वर्षांत अन्नस्वावलंबन नाहीतर फाशी अशा घोषणा हवेत सोडायच्या आणि दुसरीकडे जलसंपत्तीची अशी उपेक्षा चालू ठेवायची, या विसंगतीला काही अर्थ नाही. असे दुर्लक्ष कितीतरी ठिकाणी होत असेल! अशा जागा निवडल्या पाहिजेत, विधायक कार्यकर्त्यांनी जोरदार मोहिमा अशा ठिकाणी हाती घेतल्या पाहिजेत.

असा हा श्रमाग्रहाचा तिसरा कार्यक्रम आहे. सर्वांचे सहकार्य या निर्माण मोहिमेत, या सेतुबंधनात अपेक्षित आहे-अगदी शासन ज्या पक्षाचे आहे त्या पक्षातील कार्यकर्त्यांचेही. कारण हा संघर्ष एखाद्या पक्षाविरुद्ध नसून आपल्या गतिशून्यतेविरुद्ध आहे. सर्व गतिमान शक्तींनी यासाठी एकत्रित यावे हे उचित आहे. काळाची ही निकड आहे.

असा हा ' श्रीकैलास ते सिंधूसागर 'नंतरचा अन्नसंचलनाचा त्रिविध कायक्रम. यात चढउतार होणार, मागेपुढे करावे लागणार, जुने जाऊन नवे उपक्रम येणार हे उघड आहे. पण--

' परार्धलक्ष्मी पडली भूमी, तरी काखेला अमुच्या झोळी ।
स्वातंत्र्याच्या पारावरती अमुच्या चारित्र्याची होळी ।।

ही वस्तुस्थिती बदलेपर्यंत काही न काहीतरी चालू असेल हेही निश्चित आहे. प्रगत देश एकीकडून आमची लूटमार करीत आहेत आणि ' भिकारी ' म्हणूनही त्याचवेळी आमची जगभर पद्धतशीर निंदानालस्ती आणि बदनामीही चालू ठेवीत आहेत. आमच्या पडखाऊ, भीकमाग्या धोरणांमुळे किंवा हितसंबंधांच्या दडपणामुळे ही दुहेरी विटंबना आणखीनच वाढते आहे. कुठेतरी हे थांबले पाहिजे. थांबवले पाहिजे. हे दुष्टचक्र फोडले पाहिजे. यासाठी मित्रांनो ! हे संचलन होते व आहेही. सुचेल ती वाट, सापडेल तो दरवाजा. पण स्वस्थ राहाणे नाही एवढेच आश्वासन, एवढीच सर्वांकडून अपेक्षा.

—श्री. ग. माजगावकर


# पुरंदऱ्यांची नौबत

**ब. मो. पुरंदरे**

मूल्य : साडेतीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

# फादर फेरेरचे पाठीराखे

फादर फेरेर यांच्या भारतातील वास्तव्याची मुदत वाढवून घेण्याच्या कार्यात त्यांच्या पाठीराख्यांना यश आलेले आहे. गेल्या आठवड्यात केंद्रीय गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी लोकसभेत फादर फेरेर प्रकरणासंबंधी निवेदन करताना ही गोष्ट स्पष्ट केली. वस्तुतः फेरेरची ताबडतोब देशातून हकालपट्टी केली पाहिजे, हा महाराष्ट्र सरकारचा निर्णय बाहेर पडल्यानंतर गेले कित्येक दिवस गाजत असलेले हे प्रकरण निकालात निघाले आहे असेच मानले जात होते. फेरेर यांच्या कारवाया आक्षेपार्ह आहेत असे महाराष्ट्र सरकारला चौकशीअंती आढळून आल्यानंतरच राज्य सरकारचा हा निर्णय जाहीर झाला. कोणत्याही राज्याच्या अंतर्गत प्रश्नांबाबत उदासीन असणारे केंद्र सरकार फेरेरच्या बाबतीत उत्साह दाखवील अशी कल्पना नव्हती.

परंतु आपल्या केंद्र सरकारला परक्यांच्या बाबतीत नको तेव्हा एवढा उमाळा येतो की जणू काही राज्य सरकारच्या निर्णयाविरुद्ध ताबडतोब कृती केली नाही तर आकाश कोसळेल असेच केंद्र सरकार मानत असावे. फादर फेरेर याने एकवीस दिवसांच्या आत भारत सोडून जावे अशी महाराष्ट्र सरकारने त्याच्यावर गेल्या महिन्याच्या पाच तारखेला नोटीस बजावली. याचा अर्थ असा की उशीरात उशीरा २६ एप्रिलपर्यंत फेरेरने भारताबाहेर पडावयास हवे. परंतु याबाबतीत केंद्रीय गृहमंत्र्यांनी लोकसभेत निवेदन करून फेरेर प्रकरणाची संपूर्ण चौकशी होईपर्यंत फेरेरला भारतात राहण्याची आपण परवानगी दिली आहे असे जाहीर करून महाराष्ट्र सरकारचा निर्णय रद्दबातल ठरविला.

व्हिन्सेंट फेरेर हा स्पॅनिश मिशनरी निरक्षर भारतीयांना साक्षर करण्याच्या 'उदात्त' हेतूने सोळा वर्षांपूर्वी भारतात आला. गेल्या दहा वर्षांपासून मनमाड भागात त्याने आपले कार्य केंद्रित केले आहे. नाशिक जिल्ह्यातील भूमिहीन शेतकऱ्यांसाठी फेरेरने दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र शेतकरी सेवा मंडळ नावाची संस्था चालविली. या संस्थेमार्फत अवघ्या एका वर्षाच्या अवधीमध्ये फेरेरसाहेबांनी गरीब भारतीय शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी पंचाहत्तर लाखांहून अधिक रुपयांची खैरात केलेली आहे. पैशाने नाडलेल्या आणि शिक्षणापासून वंचित असलेल्या मनमाड भागातील शेतकऱ्यांना ख्रिस्ती धर्माच्या जाळ्यात ओढण्यासाठीच फेरेरसाहेबांचे हे तथाकथित सेवाकार्य चालू आहे ही गोष्ट महाराष्ट्र सरकारच्याही उशीरा नजरेला आली. फेरेरच्या राष्ट्रविरोधी कारवायांसंबंधी नाशिक जिल्ह्यातील लोकांचा

गेले कित्येक दिवस ओरडा चालू होता. पण कोणत्याही प्रकरणाची तात्काळ दखल घ्यायची नाही हा आपल्या सरकारी यंत्रणेचा खाक्या याही वेळी पाहावयास मिळाला. शेवटी लोकांची फारच ओरड होते आहे असे आढळून आल्यानंतर मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी फेरेरच्या कारवायांची व त्या मागच्या उद्दिष्टांची चौकशी करण्यासाठी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक केली आणि या अधिकाऱ्याने आपल्या पाहणीअंती जो अहवाल सरकारला सादर केला त्या आधारे फेरेर हा मिशनरी राष्ट्रविरोधी कारवाया करीत असून त्याला भारताबाहेर हाकललेच पाहिजे असा महाराष्ट्र सरकारने हुकूम काढला.

महाराष्ट्र सरकारने उशीरा का होईना पण देशहिताच्या दृष्टीने उचित् कृती केली याबद्दल प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकाने या सरकारचे अभिनंदनच करायला हवे. परंतु आमच्या काही संसद-सदस्यांना नको त्या वेळी घटनतील व्यक्तिस्वातंत्र्या· विषयक कलमांची आठवण झाली आणि फादर फेरेर हा निरपराधी आहे असा निर्वाळा देऊन त्याच्याविरुद्ध उपाययोजना न करण्याची त्यांनी केंद्र सरकारला विनंती केली. संसदसदस्यांच्या निवेदनांची दखल घेण्याबाबत केंद्र सरकारही फारसे तत्पर नसते. पण फादर फेरेरविषयी केंद्र सरकारला एवढी आस्था वाटायला लागली की एका घटक राज्य सरकारचा निर्णयही बाजूला फेकून देण्याची केंद्र सरकारने हिंमत दाखविली.

## धर्मांतरानंतर राष्ट्रांतर

याबाबतीत पहिला प्रश्न असा उपस्थित होतो की चारशे वर्षांपूर्वी पोर्तुग्रीज राज सत्तेबरोबर गोव्यात पाय ठेवल्यापासून मिशनऱ्यांनी या देशात कोणते कार्य केलेले आहे याचा आमच्या सरकारला पत्ताच नाही की काय! उघडउघड ख्रिश्चन धर्मप्रसाराचे निशाण हातात घेऊन भारतीय भूमीवर उतरलेली मंडळी भारतीय जन-तेतील अज्ञानाचा आणि दारिद्र्याचा फायदा घेऊन त्यांना आपल्या धर्मात खेचतात. हे धर्मांतर स्वेच्छेने झाले असते तर त्याला कोणीच हरकत घेतली नसती. परंतु वेळप्रसंगी या अडाणी लोकांचा छळ करायलाही या ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी मागे पुढे पाहिलेले नाही. बरे एखादा माणूस हिंदुधर्म सोडून ख्रिश्चन झाला त्यात फारसे काय बिघडले असला जयप्रकाश नारायणांसारख्या अतिविशाल सर्वोदय-वाल्याला शोभणारा दुबळा प्रश्न कोणी विचारू नये हे चांगले, कारण धर्मान्तरा-बरोबरच राष्ट्रान्तराचीही शिकवण देण्यात येते याचे पुरावे नागाप्रदेशापासून केरळा पर्यंत जागोजाग पाहावयास मिळतात. नागा आणि मिझो या आदिवासी जमातीं-मध्ये गेली शंभर वर्षे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी जे कार्य केले त्याचे फलित कोणते हा प्रश्न विचारणाऱ्याला आज भारताच्या ईशान्य सीमाप्रदेशामध्ये काय घडत आहे असा प्रतिप्रश्न विचारावयास हरकत नाही. परंतु विश्वबंधुत्वाची आणि सहिष्णुतेची आम्हांला इतकी तहान लागली आहे की त्या पायी या देशाच्या अविभाज्यतेला

आणि सुरक्षिततेला धोका निर्माण झाला तरीही त्याची फिकीर करायची नाही अशीच आमची धारणा असते. याबाबतीत आपला प्रजासमाजवादी पक्ष तर फारच सोवळा आहे. कम्युनिस्टांच्या राष्ट्रद्रोही कारवायांवर कडक लक्ष ठेवा असे वेळी अवेळी प्रतिपादन करणाऱ्या या पक्षाला राष्ट्रद्रोही कारवाया खेळणाऱ्या ख्रिश्चन मिशनऱ्यांबाबत आणि जात्यंध मुसलमानाबाबत एवढा कळवळा वाटतो की सरकारने एखाद्या मिशनऱ्याविरुद्ध वा मुसलमानांविरुद्ध कारवाई करण्याचा मनसुबा केला कीयांचा जीव घाबरा होता. फादर फेरेरबाबतही असेच घडले आहे. श्री. मधु दंडवते हे प्रजासमाजवादी पक्षाचे मुंबईतील प्रमुख कार्यकर्ते आहेत. महाराष्ट्र सरकारने एका परकीय मिशनऱ्याला देशाबाहेर जाण्याचा हुकूम द्यावा याचा या प्रजासमाजवादी कार्यकर्त्याला एवढा सात्त्विक संताप आला की, लागलीच स्वतंत्र पक्षाशी हात मिळवणी करून फेरेर येथे राहिलाच पाहिजे अशी गर्जना करावयास प्रारंभ केला.

## आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचा प्रश्न !

ज्या वेळेस चीनने भारतावर आक्रमण केले त्या वेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने देशभर चीनवादी कम्युनिस्टांची धरपकड करण्यात आली. पाकिस्तानने आक्रमण केले त्या वेळेला जात्यंध मुसलमानांनाही केवळ धोका नको या सावधानतेपायी तुरुंगाच्या गजाआड बंद करण्यात आले. हे जे लोक त्या वेळी पकडले होते त्यातील प्रत्येक जण परकीय हस्तक होता असे नव्हे. ओल्याबरोबर सुकेही जळते या न्यायाने एखाद्या निरपराध व्यक्तीलाही या वेळी तुरुंगवास सहन करावा लागला असेल. केवळ व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार केला तर सरकारचे हे कृत्य गर्ह्य मानावे लागेल. म्हणून देशाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला असताना असला मूर्ख प्रश्न कोणी विचारीत नाही. फादर फेरेर कदाचित निर्दोषी असेलही. पण आतापर्यंतच्या मिशनरी संस्थांच्या कारवायांचा इतिहास ध्यानी घेतल्यानंतर या राष्ट्रद्रोही कारवायांना आळा घालण्यासाठी सरकारला वाजवीपेक्षा अधिक कठोर व्हावे लागले तर ते स्वाभाविक म्हणावे लागेल. अशा वेळी एखादी व्यक्ती कशी आहे हा विचार दुय्यम महत्त्वाचा ठरतो.

फेरेर यांना जर मानवसेवाच करायची असेल तर त्यांना ती कोठेही करता येईल. त्यासाठी आपल्याला भारतातच राहायला मिळाले पाहिजे हा आग्रह कशासाठी ? जो या देशाचा नागरिक नाही त्याला या देशाच्या मर्जीविरुद्ध राहण्याचा बिलकुल अधिकार नाही. वस्तुतः फादर फेरेरला हे सारे समजावून सांगायला हवे. परंतु हे घडण्याएवजी आमचे प्रजासमाजवादी मित्र आणि त्यांचे सहकारी सरकारलाच दूषणे देऊ लागले आहेत. आता तर काय जनमत अव्हेरून केंद्र सरकारही फेरेरच्या पाठीशी उभे राहू इच्छित आहे' आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेसाठी स्वहिताकडे दुर्लक्ष करण्याचा आपला जुना वारसा केंद्रसरकार अद्यापही चालवीत आहे हेच यावरून सिद्ध होते. दुसरे काय ?

—सदाशिव पेठकर



रब्बी पिके निघाली...
...खरीप पिकांची उसाभर
आता सुरू होणार
संकरित बियाणे वापरून
अन्नधान्य स्वयंपूर्णतेचे
ध्येय गाठू !
आठव्या महाराष्ट्र दिनाची हीच प्रतिज्ञा



प्रा. तोरडमल आणि भारती मालवणकर [छाया : अरुण राजदत्त]

'चाफा बोलेना' हे एखाद्या नाटकाचे नाव किती हळुवार आणि हळवे आहे, नाही ? या नावाचे नाटक गजानन नाटय मंदिर या पारंपारिक नावाच्या व्यावसायिक नाटयसंस्थेने नुकतेच रंगभूमीवर आणले. एखाद्या नाटकाचा विषय आणि त्याचे नाव यांची समसमा गाठ क्वचितच पडते. नाव दणदणीत तर विषय – आणि बहुधा नाटकही – फुसके, कौटुंबिक निघते. नाव लांबलचक काव्य-मय तर नाटक भलतेच गद्य आणि क्वचित खून, पंचनामे असलेल्या भयंकर रक्तरंजित गोष्टींनी उतू जाणारे आढळते. नाव विनोदी, असले तर नाटकाचा 'मोले घातले रडाया'चा प्रकार झालेला सापडतो. माणसांच्या नावाप्रमाणे नाटकांच्या नावात एकंदरीत विसंगती फार. या परिस्थितीत एक हृद्रोगी तरुण मुलगी, तिच्या जीवितासाठी तिला प्रणय आणि मातृत्वापासून लांब ठेवण्यासाठी वज्राहून कठोर बनू बघणारा तिचा पिता आणि एक उमदा, समंजस, देखणा तरुण हा भावनात्मक त्रिकोण कथावस्तू म्हणून घेतलेल्या नाटकाला 'चाफा बोलेना' हे नाजूक नाव केवढे सार्थ होते ! या तिघांच्या काळजामधल्या ऊर्मी, त्यांचा संयम, त्यांचे स्वतः-

# चा फा बो ले ना

## चाफा तसा पुष्कळ बोलला
## बोल बोल बोलला.
## बोलला नाही ते एक रहस्य
## पण न बोलताच ते
## अर्ध्या नाटकात प्रेक्षकांना कळले.

शीच घडणारे मानसिक संघर्ष, आणि त्यांच्या इच्छाशक्तींपलीकडे अदृश्य स्वरूपात उभा राहून ही सारी समस्या एका अपरिहार्य शोकात्मिकेकडे खेचत नेणारा कर्तुम-कतुम निसर्ग हे प्रकरण तसे साधेसुधे नव्हते. मुग्ध भावभावनांचा फार समर्थ खेळ या नाटकात दिसू शकला असता.

पण 'बोलेना' नावाचा हा रंगभूमीवरचा चाफा 'बी' कवींच्या दुर्दैवाने अतोनात बोलका निघाला. तो अखेरपर्यंत बोल बोल बोलला. बोलला नाही ते एक रहस्य. आणि न बोलताच ते अर्ध्या नाटकात तमाम प्रेक्षकांना कळले.

म्हणजे त्या तरुण नायिकेला हृद्रोग आहे, हेच लेखक गो. गं. पारखी यांनी रहस्य ठेवले. मग तिचे झुरणे, तिच्या सर्जन वडलांचा तऱ्हेवाईकपणा, तिच्या आयुष्यात आलेल्या उमद्या तरुणाशी तिचे आणि तिच्या वडिलांचे तुसडे, विक्षिप्त वागणे हे सारेच फार रहस्यमय झाले की नाही? तिचे लग्नही त्या तरुणाशी तिच्या वडिलांना अगदी मनाविरुद्ध का होईना, पण करून द्यावे लागले, तिला दिवस गेल्याचे कालांतराने उघड झाले, तरी नाटककार रहस्य काही केल्या उघड

करीना. या साऱ्याने हेलपाटत गेलेला तिचा असहाय बाप समोर दिसत असल्याने' तर्काने, उशिरा का होईना पण प्रेक्षकांनी सर्व जाणले. आणि मग नाटकाअखेरी केव्हा तरी एका लांबच्या शब्दवेल्हाळ वाटेने नाटककार त्याच्या तथाकथित रहस्याकडे एकदाचा निघाला. नायिकेच्या पित्याने एक भले मोठ्ठे आत्मगत रहस्यस्फोटाची पूर्व तयारी म्हणून जावयाला ऐकवले. त्याच्या अवेमध्ये एक संपूर्ण भावगीत दिग्दर्शक (पुरुषोत्तम बाळ) आणि संगीत दिग्दर्शक (दत्ता डावजेकर) यांनी मिळून प्रेक्षकांना ऐकवले. नंतर नाटकाच्या घशात अडकलेले ते बेटे रहस्य एकदाचे कसेबसे बाहेर आले, पण तोवर त्यात काहीच रहस्य राहिले नव्हते. मुलगी प्रसूत होत असताना तिची अवस्था गंभीर असल्याचे ऐकून मानसिक ताणात सर्जनचे प्राणोत्क्रमण रंगमंचावर झाले आणि मुलगी सुखरूप प्रसूत झाल्याचा फोन येऊन पोचला. वस्तुतः ही फार शोकप्रद घटना; पण येथवर नाटकाच्या ताणाने प्रेक्षकांच्या उत्सुकतेचे आणि भावुकतेचे जवळपास सर्जनसारखेच झाले होते आणि हा सुरेख शोकात्म शेवट दिल्ली-वाराणशीच्या भलत्याच लेट गाडी-सारखा येऊन पोचला.

## ताकदवान कथा

परिणामी हा 'चाका' तसा पुष्कळ बोलला पण तरी मुका राहिला. त्यातला खरा भावूक गाभा प्रकटलाच नाही. एक मातबर विषय आणि सुरेख नाव रहस्या-वारी गेल्याची खंत उरली. रहस्याचेच नाटक लिहायचे होते तर त्यासाठी एखादा डांबिस खलपुरुष, एखादी उच्छृंखल किंवा निष्पाप नायिका, एखादा देखणा आणि बुद्दू नायक, एखादे पिस्तुल किंवा विष आणि एक सबंध पोलिसखाते असला या प्रकारच्या नाटकांना सोईचा मालमसाला काय कमी होता? भावनात्मक संघ-र्षाच्या एका मुळातच फार समर्थ विषयाला त्यासाठी वेठीस धरण्याची काय गरज होती? हा विषय साधा सरळ मांडला जाता तरीही त्यात पोतेभर नाटच होते. प्रेक्षकांना खुर्चीत खिळवण्याची, त्यांना धक्के देण्याची, मनोमन हलविण्याची आणि हवे तर रडविण्याचीही ताकद या विषयात नक्कीच होती. मग रहस्य हवेच होते काय?

यातच रहस्याच्या जोडीला नाटककर्त्यानं विनोदाचेही एक अवांतर व्यसन केले. ड्रायव्हर, माळी, नर्स आणि कर्णिक नामक एक डॉक्टरचे पात्र ही मंडळी या व्यसनापायी नाटककाराने रंगमंचावर मोकाट सोडली. भावनात्मकता जाऊ द्या, रहस्याचेच नाटककाराला अभिप्रेत तेवढेही वजन, ही मंडळी रंगमंचावर टिकू देईनात. बरे या विनोदातही फारशी चमक नव्हती. सर्कसमधल्या विदूषकांच्या बालिश पातळीवर हा विनोद चालू होता. याचा परिणाम शेवटी उरल्या सुरल्या भावनात्मकतेचेही हसे आणि सर्कस होण्यात झाला. अभागी सर्जनचा मृत्यू आम्हांला जाणवला नाही, बसल्या बसल्या 'मेलेले' राहण्यातले नटाचे अवघड कौशल्य दिसले.

हा कुशल नट म्हणजे प्रा. तोरडमल. वस्तुत: प्रा. तोरडमल हे कुशलच नव्हेत तर अभिनयसंपन्न नट असल्याची साक्ष इतरत्र सरकारी नाट्यस्पर्धेत पटलेली आहे. या नाटकातली मध्यवर्ती भूमिका तोरडमल यांना फिट्ट बसणारीच होती आणि रहस्य-विनोदाच्या आडवाटेला नाटककर्ता न जाता, तर हे नाटक त्याच्या स्वभावगत भावुक वाटेने प्रा. तोरडमल यांनी बरेच उंच नेले असते, असे मानण्याला भरपूर आशा आहे. पण तो योग नव्हता. त्यांचा काही 'स्कोप' काढून घेऊन नाटककाराने तो माळी आणि ड्रायव्हर या जोडगोळीला दान केला होता. या दोघांचा नाटकाशी संबंध म्हणजे माळ्याचीही मुलगी अपघात होऊन सीरिअस होते आणि मृत्यू पावते आणि ड्रायव्हर छोट्या मालकिणीला तिच्या लग्नाच्या गुप्त बेतात कर्तव्यबुद्धीने मदत करतो, एवढाच. या व्यतिरिक्त नाटकाआधी घडून गेलेल्या काही महत्त्वाच्या गोष्टीही या दोघांकरवी रूढपद्धतीप्रमाणे नाटककाराने प्रेक्षकांना अनेक वाह्यात आणि बिनमहत्त्वाच्या गोष्टींबरोबर नाटकाच्या पहिल्या अंकात सुनावल्या. पण केवळ एवढ्यासाठी नाटकात घेतलेल्या या पात्रांनी जवळ जवळ निम्मे नाटक असे ना तसे व्यापले. या दोघांच्या भूमिका अनुक्रमे गणेश सोळंकी (माळी) आणि सतीश दुभाषी (ड्रायव्हर) या दोन नव्या दमाच्या गुणी नटांनी व्यावसायिक नटांच्या चोख इमानाने प्रत्येक 'जागा' वसूल करीत केल्या. नायिका म्हणून भारती मालवणकर नायिकेची भावुक, शोकात्म भूमिका लक्षात घेता जरा अधिक नटल्या होत्या. त्यांचा समजूतदार आणि संयमी अभिनय रहस्याच्या लुड-बुडत्या भानगडीत जेवढा जाणवणे शक्य तेवढा जाणवला. नायक म्हणून नरेन चव्हाण उमदे दिसले पण रंगमंचावरचे त्यांचे एक बुद्धिमान डॉक्टर म्हणून वावरणे या उमदेपणाला साजेसे, मोकळे आणि अकृत्रिम वाटले नाही. त्यांच्याही पायात नेमके नको तेव्हा नाटकातले रहस्य येत असावे. मुक्या मोलकरणीच्या किरकोळ भूमिकेत ('चाफा बोलेना' या नावाशी या नाटकात, ही एवढीच काय ती सुसंगत गोष्ट होती !) वैजयंती फाळके मुक्या वाटल्या पण मोलकरीण वाटल्या नाहीत; किंबहुना याच विषयावरच्या एखाद्या विशुद्ध भावुक नाटकात नायिका म्हणून त्या कदाचित प्रभावी ठरल्या असत्या असेही वाटले.

दिग्दर्शनात रहस्य-नाटकाची जाण होती (पहिल्या अंकाअखेरी प्रकाशवलयात निःस्तब्ध पाठमोरा नायक आणि त्याच्या निश्चल हाती किल्ल्यांची हलती साखळी, वगैरे.) पण भावनाप्रधान प्रसंगांना विविध 'इफेक्टस'च्या या कृत्रिम युक्त्यांनी फारसा उठाव मिळू शकत नाही, त्यासाठी नटांच्या वैयक्तिक आणि सांघिक अभि-नयाचाच उपयोग होतो. आणि शिवाय एका क्रमाने ही भावुकता मूळ नाटकातच फुलत जावी लागते. लिखित नाटकातल्या आशयात्मक उणिवा नाटककर्त्याच्या धरल्या तरी तांत्रिक गफलतींची निम्मी भागीदारी दिग्दर्शकाकडेही जाते. अर्थात व्यवसायात एखादे लिखित नाटक दिग्दर्शकाला 'जो हुकूम' पद्धतीनेही डोळे मिटून

दिग्दर्शित करावे लागते. एवढे खरे की, 'चाफा बोलेना 'तली हास्यास्पद होऊ पाहणारी भावुकता दिग्दर्शकही सावरू शकला नाही. आणि रहस्याचे मुळातच काही खरे नव्हते.

रघुवीर तळाशीलकरांच्या नेपथ्याचा स्वतंत्र उल्लेख केला पाहिजे. एवढे खोटे आणि तकलादू नेपथ्य त्यांनी आजवर कधीही मांडल्याचे पाहण्यात नाही. मग ते निदान एरवीच चित्ताकर्षक आणि भव्य-दिव्य वगैरे तरी असावे. पण तसेही नव्हते.

जाऊ द्या. एखादी रात्र अशीही जाते. ◻


# शुतुरमुर्ग

# २

नाट्यगृहातला प्रेक्षकांचा सर्वांत मोठा आनंद कोणता असतो, सांगा. प्रत्येकाच्या मनात ठसठसत असते तेच नेमके म्हटले गेल्याचा ! आकस्मिकपणे हे घडते तेव्हा तर कसे झक्क वाटते.

'शुतुरमुर्ग ' नावाच्या हिंदी नाटकाला असा काही दिवसांपूर्वी गेलो तेव्हा शुतुर-मुर्ग हे काय प्रकरण असते, हे विचारण्या-पासून आरंभ होता. कोणीतरी म्हणाले, शहामृग. थिएटर युनिट या मुंबईकर नाट्यसंस्थेतर्फे हे हिंदी शहामृग रंगमंचावर येत होते. कानपूर-निवासी ग्यानदेव अग्निहोत्री हे या नाटकाचे कर्ते. कल-कत्त्यात अनामिका कला संगम या नाट्य-संस्थेने याचे पहिले प्रयोग केले आणि ते गाजले. थिएटर युनिट करणार असलेला या नाटकाचा प्रयोग पाहण्याची उत्सुकता हे कळल्याने वाढली. पण हे बेटे शहामृग आपल्या मनातलेच निघेल असे मुळीच वाटले नव्हते.

शहामृग, परिस्थितीला तोंड देता येत नाही, तेव्हा पाठ देते. आणि तोंड वाळूत खुपसून राहते. असे म्हणतात की याने त्याला वाटत राहते की आपल्याला कोणी पाहात नाही. ही पराभूत आणि दिवा-स्वप्नात राहून स्वतःला फसवणारी वृत्ती-



हे मरणोन्मुख मानवा ! तू खरोखरच महान आहेस..

हिचे विदारक दर्शन आणि अपरिहार्य परिणती दाखवण्याचा हा नाट्यरूप प्रयत्न होता.

या नाटकात एक नगरी होती. तिचे नाव शुतुरनगरी. या नगरीचा होता एक राजा. सुरवार, नेहरू सदरा घातलेला, हातात एक छोटी काठी रूबाबात धरून तिच्याशी चाळा करणारा. दिसण्यात अगदी जन्मजात राजा असावा तसा. त्याला होती एक भावलीसारखी राणी; आणि एक मंत्रिमंडळ, ज्यात न्यायमंत्री आणि रक्षामंत्र्याबरोबर एक खास भाषणमंत्रीही होता. एक अन्नदाता नामक मंत्री होता. पण हा परखड सत्यच बोले, मग ते कुणी ऐको, न ऐको, कुणाला मानवो, न मानवो. राजाचे एक स्वप्न होते. शुतुरनगरीला साजेसे प्रतीक म्हणून सोन्याचे एक प्रचंड शहामृग तयार करवून त्याची प्रतिष्ठापना नगरीत केली जावी. या स्वप्नासाठी राज्याची सारी तिजोरी प्रत्यही खाली होत होती. राजा त्याच्या या आवडत्या कल्पनेच्या पूर्तीची स्वप्ने पाहात होता. मधून मधून जनतेला धीरगंभीर, उदात्त संदेश देत होता. त्याग, कष्ट, सेवा, देश यांचे महत्त्व सांगत होता. सत्यमेव जयतेचा घोष करीत होता. जनतेच्या वतीने विरोधीलाल म्हणून एक फाटका दाढीवाला या उधळपट्टीबद्दल बोंबाबोंब करीत होता आणि राजाला गरमागरम खलिते पाठवीत होता. त्याचा बंदोबस्त चतुर राजाने त्याला मंत्री करून केला. गळचात पट्टा--साखळी अडकवून या मंत्री महाशयांचा शपथविधी झाला. जनतेपैकी मामूलीराम आपल्या या नेत्याचे काय

# बक्षिस मिळवा रु. १२००/-

प्रत्येक संस्थेचे एक बोधचिन्ह असते, ते पाहिले कीं संस्था व तिचे कार्य डोळ्यासमोर उभे राहाते. तुम्ही हें कोणाचें बोधचिन्ह आहे हें ओळखले असेलच. या संस्थेकरितां रेडिओवरील जाहिरातीसाठीं २० ते ३० शब्दापर्यंत मजकूर अथवा ध्वनिचित्र आपण सुचवा व बक्षिस मिळवा. त्यासाठी प्रवेश फी नाही. फक्त खालील प्रश्नांची उत्तरे व रेडिओ वरील जाहिरातीसाठीं या संस्थेच्या दृष्टीने योग्य तो मजकूर अथवा ध्वनिचित्र पाठवा.

परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. पसंत मजकूर वा चित्र कुठल्याही पद्धतीने वापरण्याचा हक्क संस्थेस राहील. या बाबत पत्रव्यवहार केला जाणार नाहीं.

- पहिलें बक्षिस रु. ५००
- दुसरें बक्षिस रु. २५०
- तिसरें बक्षिस रु. १५०
- चौथें बक्षिस रु. १००
- पांचवें व सहावें प्रत्येकी रु. ५०
- उत्तेजनार्थ १० बक्षिसें

उत्तरे पाठविण्याची शेवटची तारीख १० मे ६८

१ हें बोधचिन्ह कोणत्या संस्थेचे आहे ?

२ या संस्थेच्या जाहिराती आपण बघितल्या काय ? कोठें ?

३ आपल्याला कोणती जाहिरात आवडली ?

२३४४ म ४

| | |
|---|---|
| ४ आपण या संस्थेसाठी वेळी चित्रमय जाहिरात सुचवू शकाल काय? चित्रासाठी ... | |
| ५ आपण रेडिओवर या संस्थेची जाहिरात ऐकली काय? | |
| ६ रेडिओवर या संस्थेच्या जाहिराती कोणत्या भाषेत असाव्यात? | |
| ७ आपला या संस्थेशी कोठल्याही प्रकारे संबंध आहे काय? | |
| ८ आपण सुचविणार असलेला मजकूर अथवा ध्वनिचित्र: हिंदी, मराठी अगर इंग्रजी | |
| | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ आपले नांव: | १० पत्ता: | | |
| | ११ व्यवसाय: | | १२ वय |
| १३ वार्षिक उत्पन्न : रु. (ही माहिती गुप्त ठेवली जाईल) | | | |
| १४ आपण कोणती-हिंदी, मराठी, गुजराथी, इंग्रजी वर्तमानपत्रें व | १ | २ | ३ |
| मासिकें वाचतां? | ४ | ५ | ६ |

उत्तरें यांपैकी कोणत्याहि पत्त्यावर पाठवावीत:

मल्को ॲडव्हर्टायझिंग,
बी. पी. ए. रुमस्, १०७, म. गांधी रोड, मुंबई-१.

पॅरामाउंट पब्लिसिटी प्रा. लि.,
४८१ शनिवार पेठ, पुणे-२.

प्रतिभा ॲडव्हर्टायझिंग,
३३/९, प्रभात रस्ता, पुणे-४.

BM/69/16

झाले ते पाहण्यासाठी आला तेव्हा विरोधीलाल हर्षभराने मामूलीला म्हणाला, मित्रा, अरे आपले सर्व प्रश्न सुटल्यात जमा आहेत. आपली जीत झाली आहे! आता एकेक करून आपले सगळे कष्ट दूर होतील. पोटभर अन्न, निवारा, वस्त्र, सर्व काही सर्वांना मिळेल. फक्त एकच आहेः महाराजांचे हे सर्व बेत कार्यान्वित होईतोवर मला कर्तव्यबुद्धीने येथेच राहणे भाग आहे. म्हणून जनतेचा नेता म्हणून मी आता तुला नियुक्त करतो. तूच जनतेला ही आनंदवार्ता पटवून दे. मामूलीराम भोळा; त्याने हे मानले. पण लोक मानेनात. विरोध बळावला. राजाने दुसरी युक्ती काढली. राज्यावर परकी आक्रमण आल्याची जोरदार हाकाटी केली. सगळे मामूलीराम आक्रमणाच्या प्रतिकारार्थ राजनिष्ठ त्यागी, सैनिक बनले. विरोध तात्पुरता संपला. राजकारणाच्या असल्या धकाधकीच्या आणि रूक्ष मामल्यात शुतुरनगरीचे कलामंत्रिपद भूषविणाऱ्या राणीने एक सांस्कृतिक उत्सव आयोजित केला. राजाच्या जन्मोत्सवानिमित्त नृत्य–गायन आणि एक मोठी मेजवानी. येणाऱ्या प्रत्येक निमंत्रिताला राणीने केलेल्या राजाच्या स्तुतीपर काव्याची सुवर्णपत्रावरची प्रत भेट देण्यात येणार होती. पण ही वार्ता देऊन राजाला समारंभाला पाचारण करणारी दासी दुःखी होती, कारण तिच्या गावी भयंकर दुष्काळ पडल्याचे पत्र तिला मिळाले होते. राजवाडयाच्या बाहेरदेखील भूकबळी पडत असल्याची वार्ता घेऊन तेवढयात रक्षामंत्री आले. राजाला सात्त्विक संताप आला. त्याने विचारले, हे लोक घरोघर जाऊन जेवले का नाहीत. भाषणमंत्र्याने खुलासा केला, त्यांना म्हणे घरेच नाहीत. राजाने म्हटले, म्हणून काय झाले? कोठून तरी जेवून यावे की नाही? भाषणमंत्री म्हणाले, राज्यातले अन्न संपल्याचो वर्दी आली आहे. राजा म्हणाला, वर्दीचे सोडा, तुमची माहितो काय आहे? भाषणमंत्र्यांनी बिनदिक्कत सांगितले, भरपूर धान्यसाठा आहे. राजा आणखीच संतप्त होऊन म्हणाला, म्हणजे बेटे लोक जीव देतात आणि हितसंबंधी विरोधक दुष्काळाचे कारस्थान



रचून या गोष्टीचे मांडवल करतात ! भाषणमंत्री, या अराष्ट्रीय प्रवृत्तींचा बीमोड करण्याची व्यवस्था करा ! दुष्काळाच्या बातमीने मनोमन हादरलेल्या सावध राजाने धूर्तपणे स्वत:च्या जन्मोत्सवात सहभागी न होण्याचे ठरवले. सोन्याचा प्रचंड शहामृग राज्यात स्थापित करण्याचे आपले स्वप्न पुरे होईतोवर आपण असल्या सोहळ्यात भाग न घेण्याचे ठरवले आहे असे त्याने जाहीर केले. पण इकडे दुष्काळामुळे जनतेतला असंतोष पुन्हा वाढत होता. मामूलीरामही उलटू पाहात होता. चतुर राजाने यावर नवा उपाय काढला. एक दुष्काळ–चौकशी समिती नेमली ! तिची अध्यक्षा केले कलामत्रीणबाई राणीसाहेबांना. चौकशीसाठी मरणान्मुख भूकबळी शोधून आणण्यात आला. पण तो बोलेना, डोळेही उघडीना. मेला नसताना हा चौकशी समितीशी असा असहकार करतो याने क्रोधाविष्ट होऊन राणी म्हणाली, दुष्ट कुठला ! यासरशी भाषणमंत्र्यांनो नम्र जाणीव दिली की मरणोन्मुखाशी मधुर बोलणे हा शिष्टाचार आहे. तेव्हा राणी प्रेमभराने भूकबळीला म्हणाली, हे मरणोन्मुख मानवा ! तू खरोखर महान आहेस..... वगैरे वगैरे. भूकबळीने कसेबसे समितीशी सहकार्य केले आणि तो एकदाचा मेला. राणी हर्षभरीत होत्साती गहिवरून म्हणाली, मरणोन्मुख महामानवाच्या महाकाव्याचा अन्त झाला ! आणि एकदम ढसाढसा रडू लागली. मंत्रिमंडळाला राणीने रडण्यासारखे एकदम काय झाले ते कळेना. राणी रडतच म्हणाली, मी तर मेली विसरूनच गेले होते की ! माणूस मेल्यावर रडण्याचा शिष्टाचार आहे !

चौकशी होऊनही दुष्काळ ओसरला नाही; तेव्हा चतुर राजेसाहेबांनी भुकेची 'परिभाषा' बदलली असल्याचा नवा वटहुकूम काढला. भूक ही यानंतर शारीरिक अवस्था न राहता मानसिक स्थिती मानली जाणार होती ! पोटात भूक पडली तर गोष्ट वेगळी; पण मनस्थितो भुकेली होऊन माणसे त्यामुळे मेल्यास त्याला राज्ययंत्र काय करणार ? अशा प्रकारे भूक-समस्या निकालात काढण्यात आली. समस्या


गुटगुटीत मुले जिथे दिसतात
तिथे समजावे बालकांच्या आरोग्यासाठी त्या घरी अर्कशालानिर्मित
**शिशुजीवन**
वापरात असते. सर्वत्र मिळते.
बालकांचे विकारांवर गुणकारी. तसेच चांगले शक्तिवर्धक
**आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा**
विक्री केंद्र– कोल्हापूर, मुंबई, अकोला,
नांदेड, हुबळी, हैद्राबाद.
[ मावळा, सातारा. ]

सुटणे सर्वस्वी कालाधीन; त्याची चिंता राजाला कशाला? त्या स्वतःपुरत्या निकालात काढल्या की संपले! समस्याच समस्यांचा उपाय असतात हे तर राजाचे लाडके तत्त्व!

## वेगवान घटना

पण लोक आता फारच क्रोधायमान झाले होते. राजवाड्यासमोर जमले होते. कोणत्याही क्षणी हिंसक चळवळ सुरू होऊ शकत होती. राजाला ही वार्ता प्राप्त होताच तो सवयीने आणि डौलाने म्हणाला, स्थिती को नियंत्रण में लाया जाय! एक मंत्री म्हणाला, ती आता नियंत्रणापलीकडे गेली आहे, महाराज. आता परि-भाषा बदलूनदेखील ती सुधारण्याजोगी नाही! तुमचे सोन्याचे प्रचंड शहामृग दुभंगू घातले आहे. यावर राजा भावविवश झाला. तो म्हणाला, शहामृग अमर आहे. ते नाशवंत असले तरी त्याचे दर्शन तर नक्कीच चिरंतन आहे. कोणाला ना कोणाला ते भविष्यात घडत राहीलच. त्याच्या सुवर्णप्रतिमा तयार केल्या जातील. शहामृग अमर आहे! आपले राजपद कायम राहील असे वचन घेऊन अखेर राजाने सोन्याचे प्रचंड शहामृग नष्ट करण्याला मंत्रिमंडळाच्या वाढत्या दबावाखाली संमती दिली. परंतु गतीचे चक्र थांबवणे शक्य नव्हते. नोकर–चाकर राजवाडा सोडून गेले होते. मामूलीराम राजाच्या भेटीला दृढ निर्धाराने आला. आपले ठेवणीतले स्मित करून राजाने त्याला बातमी दिली, तुम्हा लोकांना एवढे दिवस नको असलेला सोन्याचा शहामृग नष्ट करण्याची आज्ञा आम्ही दिली आहे. मामूलीरामने सुनावले, महाराज, त्याची गरज नव्हती. सोन्याचा शहामृग कधी घडलाच नाही. तो कागदा-वरच राहिला. मंत्रिमंडळाने तुम्हांला हातोहात ठकवले. परंतु खरोखरीचा शहामृग तर आपणच आहात! आम्हांला खाऊन पिऊन आपण स्वतःचे पोषण करीत नाही का आलात? राजा मामूलीरामच्या निर्धारयुक्त स्वराने आणि मुद्रेने जरा भयभीत होऊन म्हणाला, मामूलीराम, मित्रा, देशहितासाठी यानंतर आपण सर्वजण एक होऊन झटलो तर तरणोपाय आहे. तू तुझ्या त्या जनतेसमोर आम्हांला घेऊन चल. आमचे राजपद आम्हांला राहील एवढे वचन जनता देणार असेल तर एकूण एक समस्या आपण धडाधड सोडवून टाकू, आहे काय त्यात? भ्रष्टाचार करणारे राष्ट्रद्रोही मंत्रिमंडळ बडतर्फ करून मंत्र्यांना कडक शासन करू. अरे मग आम्ही जनतेचेच!

मामूलीराम याने न फसता बोलला, महाराज, एक तर आपण फार बडे अभि-नेते तरी आहात, नाहीतर महामूर्ख आहात. तुमच्या या गोड गोड शब्दांना आणि वचनांना आता मी किंवा जनता भुलेल असे तुम्हांला कसे वाटते? आपल्याला जनतेसमोर तर यावे लागेलच, पण ते प्रायश्चित्तासाठी!

परंतु पाताळयंत्री मंत्रिमंडळाने तेवढ्यात मामूलीरामचा खून केला. आणि आपली खरी स्वरूपे दाखवीत राजाभोवती त्याने कडे आवळले. राजा ओरडत

होता, समजले-सर्व समजले–तुम्ही आम्हांला निर्वासित करू बघना, आम्हाला पदच्युत करू पाहता–पण तुमच्या अंतरंगातून आमचे उच्चाटन कसे कराल? तुम्ही आमचे वंशज बनाल आणि आमची महान परंपरा चालवाल असे वरदान आम्ही तुम्हाला देतो—

शहामृगवादी राजा या आवळल्या जाणाऱ्या कड्यात अदृश्य झाला आणि मुख्य नाटक काळोखात संपले. यानंतर आरंभी नाटकाचा प्रस्ताव करीत प्रेक्षकांपुढे आलेला राजा नाटकाचा उपसंहार करण्यासाठी पुन्हा प्रेक्षकांसमोर आला. आपल्या चतुर मुद्रेने मुलायम स्मित करीत तो म्हणाला, सोन्याचे शहामृग कधी बनलेच नाही आणि अर्थात नष्टही झाले नाही हे तर मी सदैव जाणतच होतो. सोन्याच्या शहामृगाची ही कल्पना मी काढली. कारण मीच मुळात एक सचेतन शहामृग होतो. पण सोन्याचा शहामृग म्हणजे काही माझ दर्शन नव्हते की तो माझा स्वभाव अथवा धर्मही नव्हता. ते केवळ होते शक्ती आणि सत्ता सुरक्षित राखण्याचे एक धोरण. बस्स! त्यापोटी लागेल तेवढा पैसा मी ओतीत राहिलो तो काही मावडेपणाने नव्हे, या पैशाने संबंधित सर्वजण सुखोपभोगात दंग राहतील आणि माझे सिंहासन सुरक्षित राहील हाच माझा हिशेब होता! पण आता मी एक राजाच नव्हे, एका अनन्त नाटकाचा शाश्वत सूत्रधार आहे, सूत्रधार. म्हणूनच 'आम्ही' ऐवजी आता पुनः मी 'मी' झालो आहे—

इथे अकस्मात अंधाऱ्या प्रेक्षागृहातून एकजण रंगमंचासमोर आला, त्याने क्षणार्धात पिस्तूल काढले आणि 'राजा'वर गोळ्या झाडल्या. हे करताना उंच, घोगऱ्या स्वरात तो ओरडला, वंदे मातरम्! वंदे मातरम्!

राजा खाली कोसळला. क्षणा आधीचा चतुर पुरुष आणि शाश्वत सूत्रधार होत्याचा नव्हता झाला.

असे हे नाटक. अंक, मध्यंतरे वगैरेचे टप्पे न घेता हे सुरू झाले आणि अखंडितपणे दीड तास चालून संपले. एरवी कित्येक वर्षे व्यापणारा एक कालखंड भराभर आम्हा प्रेक्षकांसमोर रंगमंचावर उलगडत नेला. घटना एका वादळी वेगाने घडत गेल्या. व्यवसायाने राज्यकर्ता असलेला एक चतुर, हरहुन्नरी, मोहक व्यक्तिमत्त्वाचा, धीरगंभीर वक्तृत्वाचा, शहामृगवृत्तीचा पुरुषावतार रंगमंचावर वाढत आणि छाटला जात जाऊन शेवटी अक्षरशः जमीनदोस्त झाला. या दरम्यान ज्वलंत विरोधक विरोधीलाल पाहता पाहता राजाचा मंत्री सुबोधीलाल बनला, भावडा मामूलीराम अनुभवांनी शहाणा होऊन त्याच क्षणी राजाच्या मंत्र्यांकडून ठार मारला गेला. कठोर सत्यप्रतिपादन करणारा मंत्री अन्नदाता सत्यप्रतिपादन हा आपला राजाकडून त्याप्रकरणी अधिक धन मिळविण्यासाठी धंदा होता, असे निःसंकोचपणे जाहीर करून राजाऐवजी सिंहासनावर स्वतः बसण्याला सज्ज झाला. असे बरेच काही देखताडोळा या नाटकात एका तर्कशुद्ध पद्धतीने पण फार वेगाने घडत

गेले आणि ते पाहताना मी स्वतःला बव्हंशी विसरलो, समोरच्या नाटकात माझ्या नित्य परिचयाची चित्रे प्रतिबिंबित होताना पाहण्यात रंगलो. काही संवादांना मोठ्यांदा हसलो, उदा. **राजा** : मंत्री, हे विरोधीलाल कोण ते जरा विस्ताराने कळ द्या. **मंत्री** : हा जनतेचा नेता आहे महाराज आणि आपल्या राजनीतीचा घोर शत्रू. **राजा** (साश्चर्य) आमच्या राजनीतीचा घोर शत्रू ? मंत्री, म्हणजे आमची एखादी. राजनीती आहे म्हणता ? **मंत्री** : महाराजांची नीती अवश्य आहे आणि ती म्हणजे महाराजांना नीतीच नाही. किंवा : परकी आक्रमणाची घोषणा करताना **राजा** : (धीरगंभीर स्वरात राष्ट्राला एक होण्याचे आवाहन केल्यानंतर ठेवणीतल्या व्यथित स्वरात) आपल्यापुढे यानंतर वाढून ठेवला आहे एक प्रदीर्घ आणि घोर संघर्ष आम्ही आमच्या प्रजेला अशा परिस्थितीत अन्य काहीही देऊ शकत नाही, यानंतर देऊ केवळ अपरिमित कष्ट, अश्रू आणि क्लेश ! बस्स ! सत्यमेव जयते.) काही दृश्यांनी शहारलो. (दाढीवाला विरोधीलाल मंत्री बनून गळयात कुत्र्याचा पट्टा अडकवल्या स्थितीत राजनिष्ठेची शपथ घेतो ते दृश्य किंवा दुष्काळ-चौकशी समितीची प्रमुख राणी होतकरू मूकबळीला उभे राहण्याला, चालण्याला आणि मरण्याला सांगते आणि या सगळयाचा अहवाल लिहिते ते दृश्य.) आणि अखेरीने सुन्न झालो.

## जीवनस्पर्शी सूत्र

तसे या नाटकात सस्पेन्स मनोविश्लेषण वगैरे फारसे काहीच नव्हते. मुंबईतल्या या प्रयोगात (कलकत्त्याच्या प्रयोगात म्हणे राजप्रासादादी दृश्यांचे वास्तवदर्शी नेपथ्य उभे केले होते; ) नेपथ्यही अगदीच एका एकरंगी पडद्याचे आणि कामचलाऊ बैठकीचे होते. नाही म्हणायला मागून कल्पक 'इफेक्टस' दिले जात होते. (राजाच्या वाढदिवसानिमत्त राणीने केलेल्या कवितेचे वाचन राजा मनातल्या मनात करतो.तेव्हा 'तुम जियो हजारो साल' या सस्त्या फिल्मी गाण्याची रेकॉर्ड इ. इ.) आणिप्रकाशयोजनेने नाटकाच्या आरंभी प्रेक्षकांच्या नजरा रंगमंचाकडे पक्क्या बांधून घेण्यात आल्या होत्या. एवढ्या अल्प भांडवलावर नॉन-स्टॉप दीड तास प्रेक्षकांना खुर्च्यांना खिळवणे सोपे नव्हे; परंतु ते या साध्या सरळ कथानकाच्या नाटकाच्या प्रयोगाने केले.

याचे श्रेय मुख्यतः लेखकाचे. नाटकी क्लृप्त्यांच्या भरीस न पडता त्याने एक निकडीचा विषय उत्स्फूर्त आवेशाने मांडला. या उत्स्फूर्ततेमुळे संवादांना अनेकदा गुदगुल्या करणारा बोचरेपणा आणि दाहक बोथटपणा आला; दृश्ये प्रखर सत्यकथन करणारी बनली; व्यक्तिरेखा ढोबळ राहूनही पटत गेल्या. आणि यातून वाहात गेले ते सूत्र प्रेक्षकांना आपल्या मनातले वाटले. राज्यकर्त्यांची शहामृगवृत्ती आणि त्यातून चाललेली, विनाशाकडे नेणारी एक तत्त्वहीन संधिसाधू सार्वत्रिक फरफट. हे सूत्र राजकीय होते परंतु जीवनस्पर्शी होते आणि एक व्यापक सत्यही ध्वनित करणारे होते. ते वर्तमानपत्री होते आणि तरीही नाट्यपूर्ण होते, जिवंत होते. नाटकाच्या या सूत्रानेच निम्मी बाजी मारली. उरलेली काही या सूत्राच्या

उत्स्फूर्त विस्ताराने मारली. आणि बाकीची दिग्दर्शक आणि त्याच्या नटसंचाने मिळून पुरी केली. नटसंचापेक्षाही पात्रयोजना (मुळातलेच दाढीवाले, कृश अंगकाठीचे हरी आत्मा जनतेचे नेते विरोधीलाल ऊर्फ मंत्री सुबोधीलालच्या कोलांटीमारू भूमिकेत; हे एक उदाहरण) सुयोग्य होती. राजाच्या भूमिकेत स्वत: दिग्दर्शक सत्यदेव दुबे कोणाचेही सुसंगत असे चित्र किंवा व्यंग्यचित्र उभे न करता तरीही काही ओळखीच्या रेखीव खुणा जागोजाग देत पुष्कळच यशस्वीपणे वावरले. लोरेन लोबो बाहुली राणी म्हणून बऱ्या शोभल्या. इतरांना स्वतंत्र असा वाव नव्हता. दिग्दर्शन मूळ नाटकाला न्याय देण्यापेक्षा मूळ विषयाला न्याय देणारे वाटले. नाटकाची जात 'थिएटर ऑफ द ॲब्सर्ड' कडे झुकणारी होती (त्यातील अवजड हिंदीसकट;) आणि प्रयोगाची पट्टी निखळ मेलोड्रामाची होती. अखेरच्या भागात राजाला कडे करून घेरू पाहणाऱ्या मंत्र्यांहातचे वर्तमानकालीन परदेशी संकेतांचे मुखवटेवजा सवंग फलक हे सगळेच नाटक एका प्रचारकी पातळीवर घेऊन गेले. शेवटचा राजाचा वध मुंबईच्या प्रयोगात दिग्दर्शकाने जास्तीचा घातला होता असे कळले; यानेदेखील नाटकाचा 'ॲब्सर्ड' स्वर खच्ची होण्याला मदत झाली आणि राजकीय मेलोड्रामा उरला. तोही, या दोन शब्दांतील एकालाही जात्या प्रतिकूल नसलेल्या माझ्यासारख्याला, प्रेक्षणीय आणि वेधक वाटला.

निदान, मराठीत आपले कै. खाडिलकर आणि कै. नाना जोग यांची हाताच्या बोटावरच गणती व्हावी एवढी मोजकी नाटके सोडल्यास असले प्रचलित राजकीय परिस्थितीवरचे जळजळीत, झोंबरे, हसवते आणि बेचैन करणारे रसरशीत नाटक आजकाल आलेले नाही. आहेत ते राजकीय कलापथकांचे प्रचारकी, हलकेफुलके तमाशे आणि नाटक मंडळचांची घरंदाज, नृत्यसंगीतयुक्त, रहस्यमय, तीन तासांत दहाशे चाळीस हशे घेणारी किंवा ऐतिहासिक महापुरुषाचे मनोविश्लेषण वगैरे करणारी नाटके. म्हणूनच या हिंदी 'शहामृगा'चे विशेष कौतुक. ○




सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे
विश्वसनीय ठिकाण
नाव्यपूर्ण इलेक्ट्रिक गिटार, मेंडोलीन व
बुलबुलतरंग इत्यादींचे आद्य प्रवर्तक
**हरिभाऊ विश्वनाथ कं.**
संगीत वाद्यालय
दादर, मुंबई २८.

# भिंतीच्या तुंबड्या

। सुधाकर राजे ।

## ॲटम बॉम्ब विरुद्ध रसगुल्ला

आपल्या शूर वीर पूर्वजांनी कृण्वन्तो विश्वमार्गम् अशी बुलंद घोषणा केली तेव्हा परदेश जिंकून तेथे आपले राज्य स्थापन करायचे अशी सरळसोट कल्पना त्यांच्या मनात होती. पण आधुनिक भारताचा विश्ववाद इतका क्रूड नाही. माणसाच्या हृदयापर्यंतचा रस्ता त्याच्या पोटातून जातो अशी एक आधुनिक म्हण आहे. ती बहुतेक आपल्याकडच्या स्वयंपाकघरातच तयार झाली असावी. आणि आता आपले शौर्य नव्हे तर आपला स्वयंपाक कृण्वन्तो विश्वमार्गम् ही घोषणा खरी करून दाखविणार आहे. ही चेष्टा नाही, तर नुकत्याच वाचलेल्या दोन बातम्यांनी स्पष्ट केलेले सत्य आहे. त्यातली एक बातमी म्हणजे शंभर वर्षांपूर्वी ज्या बंगाली इसमाने रसगुल्ला शोधून काढला त्याचे वंशज आता अमेरिकेत रसगुल्ले तयार करण्याचा कारखाना उघडणार आहेत व त्यासाठी लागणारे तज्ज्ञ इकडून तिकडे पाठविणार आहेत. दुसरी बातमी म्हणजे इंग्लंडने हिमाचल प्रदेश सरकारला काही लाख पौंड किमतीची " सरसोका साग " पॅकबंद डब्यातून तिकडे पाठविण्याची विनंती केली आहे. आता सांगा, साम्राज्यवादाचे हे चविष्ट टेक्निक तरवार गाजविण्यापेक्षा अधिक प्रभावी आहे की नाही ? आता अमेरिका जिंकायला रसगुल्ला आणि इंग्लंड जिंकायला ' सरसोका साग ' असा शस्त्रभेद का हे मात्र मला सांगता यायचे नाही. कदाचित एका शत्रूवर ॲटम बॉम्ब तर दुसऱ्या शत्रूवर हायड्रोजन बॉम्ब असा हा फरक असावा. आता हीच युद्धनीती इतर देशांवर वापरायची म्हणजे पाकिस्तानला चिकन बिर्याणी तर चीनला श्रीखंड-पुरी पाठवावी. खरेच, एकदा श्रीखंडाची चव कळली की " माओचा विचार " आमूलाग्र बदलेल यात शंका नाही. आणि सिलोनचा हृदयपालट करण्याचा तर एकच रामबाण उपाय आहे, व तो म्हणजे इडली डोशाची निर्यात. तात्पर्य काय, घोड्यावर बसून हुरड्यावर भूक भागविणाऱ्या पहिल्या बाजीरावापेक्षा ताटाभोवती बत्तीस वाट्या मांडणारा दुसरा बाजीराव अधिक बहाद्दर होता हे सप्रमाण सिद्ध झाले आहे.

## बिन पाण्याच्या हजामतीचे उच्च शिक्षण

परदेशी जाऊन उच्च शिक्षण घेतात ते कसले ? कोणे एके काळी याचे उत्तर सोपे होते. डॉक्टरकी, इंजिनिअरिंग किंवा कोठले तरी विज्ञान. पण आता काळ बदलला आहे. परवा दिल्लीचा एक न्हावी म्हणे उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेला. आता बोला ! तुळतुळीत डोक्यांची प्राचीन परंपरा असलेल्या आपल्या देशात डोके भादरण्याचे " टेक्निकल नो-हाऊ " उपलब्ध नसावे ही केवढी शरमेची गोष्ट आहे. कदाचित हिटलर-छाप मिशी कापता येण्यासाठी जर्मनीला जाणे आवश्यक असेल— पण तसे असेल तर ढेकूण छाप मिशी कापता येण्यासाठी प्रस्तुत न्हाव्याने पुण्यालाच जायला हवे, नाही का ! शिवाय बिनपाण्याने हजामत करण्याची पासष्टावी कला तर फक्त आम्हा भारतीयांनाच अवगत आहे. ते काही असले तरी आता इतर बऱ्याच धंद्यांतली मंडळी या न्हाव्याच्या पावलावर पाऊल टाकून आपापल्या व्यवसायाच्या उच्च शिक्षणासाठी परदेशी पळतील असा माझा होरा आहे. उदाहरणार्थ, धोबी : चादरीची मच्छरदाणी कशी करावी याच्या शिक्षणासाठी. चांभार : चपलेच्या टाचेत पुठ्ठा बेमालूम कसा लपवावा याच्या शिक्षणासाठी. शिंपी : बाईची पँट अन् पुरुषाचा ब्लाऊज कसा शिवावा याच्या शिक्षणासाठी.

## परमेश्वराचा मॉनिटरावतार

दिल्लीच्या एका चांगल्या म्हणविणाऱ्या शाळेत शिकविल्या जाणाऱ्या 'नैतिक विज्ञाना' च्या पुस्तकात पुढील वाक्य आहे. " परमेश्वराने आपला अधिकार हेडमास्तरला दिला, हेडमास्तरने तो मास्तरला दिला, व मास्तराने मॉनिटरला दिला.'- म्हणजे सचिवालयातल्या एखाद्या कारकुनान आपली कुळी थेट सूर्यवंशापर्यंत सांगावी तशातलाच प्रकार झाला. पण या परमेश्वरी परंपरेत माझ्या मते तरी बऱ्याच ग्यानबाच्या मेखा आहेत. त्यातली पहिली म्हणजे तासाभराच्या कीर्तनातही सारखी चुळबूळ करणारा हेडमास्तर परमेश्वराचे अधिकार मिळविण्याइतकी घोर तपश्चर्या करील असे मला वाटत नाही. नाही तर मग ध्रुवबाळाने परमेश्वर प्रसन्न झाल्यावर असा वर मागितला असला पाहिजे की देवा मला ध्रुवपद दे— म्हणजे कोणीही डिसमिस करू शकणार नाही असा हेडमास्तर कर. दुसरे म्हणजे कोठला हेडमास्तर राजीखुषीने व नशापाणी न करता आपले अधिकार मास्तरला देईल ? कोठलाही मास्तर स्वानुभावाने सांगू शकेल की हेडमास्तरला प्रसन्न करणे हे देवाला प्रसन्न करण्याइतके सोपे नाही. आणि तिसरे म्हणजे मॉनिटरपर्यंत येऊन पोचलेला परमेश्वरी अधिकार त्यांच्याजवळ न थांबता थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोचला अन् त्यांनी त्याच्या जोरावर परीक्षा नावाची चीज पृथ्वीतलावरून समूळ नष्ट केली, तर विद्यार्थ्यांची लीला अगाध आहे असे म्हणून (दोन्ही) हात (कोपरापासून) जोडण्याखेरीज आपल्या हातात दुसरे काय राहील ?

O




**अखेर २१ जानेवारी १९२४ हा दिवस उजाडला. याच दिवसाची स्टॅलिन वाट पाहत होता. इतिहासाला धक्का देण्यासाठी जन्मलेल्या, जगातील पहिल्या साम्यवादी राजवटीचा संस्थापक या दिवशी मरण पावला. आता दैवाचा फासा स्टॅलिनच्या बाजुने पडला होता.**

२१ जानेवारी, १९२४.

सकाळच्या वेळी एव्हडोकिया स्मिरनोव्हा लेनिनच्या न्याहारीची तयारी करीत होती. न्याहारीच्या पदार्थांची टेबलावर मांडामांड केल्यानंतर स्मिरनोव्हाने लेनिनच्या खोलीपाशी जाऊन न्याहारी तयार असल्याची वर्दी दिली. लेनिन आपल्या शयनगृहातून बाहेर आला आणि त्याने नेहमीप्रमाणे किंचित हसून स्मिरनोव्हाच्या कार्यतत्परतेची प्रशंसा केली. मालकाने कौतुक केल्यामुळे साहजिकच स्मिरनोव्हा हरखली. लेनिन नेहमी खिडकी समोरच्या खुर्चीवर बसून न्याहारी करी. आजही तो आपल्या ठराविक खुर्चीवर जाऊन बसला आणि न्याहारीला प्रारंभ करणार तोच तेथून उठला. तो कसाबसा शयन-

गृहापर्यंत चालत जाऊन अंथरुणावर पडला.

स्मिरनोव्हाला याचा काहीच बोध होईना. लेनिनची डोकेदुखी पुन्हा सुरू झाली असावी आणि त्यामुळे थोडी विश्रांती घेतल्यानंतर तो न्याहारीसाठी परतेल या आशेने स्मिरनोव्हा तेथेच थांबली. परंतु तिची अपेक्षा खोटी ठरली. लेनिनला अंथरुणावरून उठणे अशक्य झाले होते. क्रुपस्काया आणि मारिआ यांची धावपळ सुरू झाली. अर्थात् लेनिनची प्रकृती आज बरीच गंभीर झाली आहे याची त्या दोघींनाही कल्पना नव्हती.

लेनिनच्या प्रकृतीसंबंधी चौकशी करण्यासाठी क्रेमलिनहून गोर्कीला अनेक वेळा टेलिफोन येत असे. त्याप्रमाणे आजही टेलिफोनची घंटा वाजताच मारिआने रिसीव्हर उचलला आणि ती सांगू लागली: 'व्लादिमिरची प्रकृती आज बिघडली असली तरी काळजी करण्याजोगं काहीही नाही. गेले कित्येक दिवस अधूनमधून तो असाच अस्वस्थ होत असतो.'

व्लादिमिर सोरिन या लेनिनच्या जुन्या मित्राचे या वेळी गोर्की येथेच वास्तव्य होते. सकाळचा फेरफटका आटोपून लेनिनच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी तो लेनिनच्या निवासस्थानी आला तेव्हा दारातच त्याची डॉ. फोरस्टर यांच्याशी गाठ पडली. सोरिनने विचारले, 'डॉक्टर, आमचा पेशंट काय म्हणतोय ?'

'आताच त्याला झोप लागलीय. येत्या दोन–चार महिन्यांत लेनिन खडखडीत वरा होईल अशी माझी खात्री आहे,' डॉक्टरांनी उत्तर दिले.

लेनिनची प्रकृती आज नेहमीपेक्षा अधिक बिघडली आहे ही बातमी मॉस्कोत पोचल्यापासून तेथून गोर्की येथे सारखे फोन येऊ लागले. क्रुपस्काया आणि मारिआ 'त्याला आता झोप लागली आहे,' असे उत्तर देऊन वेळ निभावून नेत होत्या. लेनिनला थकव्यामुळे ग्लानी आली होती. मध्यंतरी एकदा त्याने उठून बसून चहा घेतला होता. सकाळपासून या चहाशिवाय त्याच्या पोटात काहीच गेले नव्हते. मधूनच त्याला जाग येई तेव्हा तो क्रुपस्काया आणि मारिआ यांच्याशी दोन–चार शब्द बोलण्याचा प्रयत्न करी. पण त्याच्या त्या अडखळत बाहेर येणाऱ्या शब्दांचा त्या दोघींना बोध होत नव्हता. लेनिनला तेवढ्या बोलण्याचे श्रमही सहन होत नव्हते. पुन्हा तो डोळे मिटून स्वस्थ पडून राही.

१५

संध्याकाळचे सहा वाजले. लेनिनला श्वास घ्यायला त्रास होऊ लागला. क्रुपस्कायाने डॉ. फोरटस्र यांना बोलावून घेतले. डॉक्टराना पाहिले की लेनिन चिडेल हे माहित असल्यामुळे क्रुपस्कायाने एक युक्ती योजली. लेनिनच्या पलंगाशेजारी तिने पडदा बांधला आणि पलीकडच्या बाजुला डॉक्टरांची बसण्याची व्यवस्था केली. पडदा हळूच दूर करून डॉ. फोरस्टर लेनिनला कशामुळे हा त्रास होत असावा याचा अंदाज घेत आणि त्यानुसार क्रुपस्का-

याला औषधयोजना समजावून सांगत. डॉक्टरांच्या औषधामुळे लेनिनला नीट श्वास घेता येऊ लागला.

डॉ. फोरस्टर आपल्या निवासस्थानी परतले. परंतु तेवढयात लेनिनला पुन्हा मधाचा त्रास होऊ लागल्याचा निरोप आला. डॉ. फोरस्टर लेनिनच्या खोलीत आले तेव्हा त्याच्या घशातून चमत्कारिक आवाज येत होता. जगण्यासाठी क्षीण धडपड करणाऱ्या माणसाचा चेहरा जसा दिसतो तसा लेनिन दिसत होता. त्याची शुद्ध हरपली होती आणि एकदम तापही वाढू लागला.

लेनिनची अखेर जवळ आली आहे हे ऋपस्कायाला कळून चुकले.

सोरिन आपल्या घरी विश्रांती घेत बसला असताना लेनिनचा नोकर घाईघाईने तेथे आला आणि त्याने सोरिनला विचारले, 'तुमच्याकडे कापूर आहे का ?

'कशासाठी ?'

'हृदयक्रिया नीट चालू राहावी म्हणून लेनिनला कापूर द्या असं कुणीतरी सांगितलं म्हणून.'

सोरिन कापूर शोधू लागला. इकडे लेनिनला श्वास घ्यायला आणखी त्रास होऊ लागला होता. डॉ. फोरस्टर यांनी डॉ. एलिस्ट्रॅटोव्ह आणि डॉ. ओसिपोव्ह यांना बोलावून घेतले. तिघांच्या विचाराने लेनिनवर उपचार होत होते. परंतु या उपचारांचा काहीही उपयोग होणार नाही हे लेनिनच्या शरीराकडे पाहिले की कोणालाही समजण्यासारखे होते. सगळ्यांच्याच चेहऱ्यावर आगामी संकटाची चाहूल दिसत होती. लेनिनच्या जिवाची ती केविलवाणी तगमग पाहवत नव्हती. डॉक्टर सांगतील ते औषध आणण्यासाठी ऋपस्कायाची धावपळ सुरू होती. काही मिनिटांच्या आतच लेनिनच्या शरीराची हालचाल थंडावली. डॉ. फोरस्टर यानी पडदा बाजुला सारला आणि लेनिनचा हात आपल्या हातात घेतला. त्या गार हाताचा स्पर्श होताच डॉक्टरांनी नाडी हाताला लागते आहे काय हे पाहिले. पण नाडी हाताला लागेना.

जड अंतःकरणाने डॉ. फोरस्टर म्हणाले, 'लेनिन आपल्याला सोडून गेला आहे.'

थोड्या वेळाने लेनिनचा मृत देह तळमजल्यावरच्या दिवाणखान्यात आणण्यात आला आणि रशियन पद्धतीप्रमाणे तो टेबलावर ठेवण्यात आला. लेनिनच्या निधनाची बातमी गोर्की गावात चटकन पसरली. लेनिनच्या अंत्यदर्शनासाठी गावकऱ्यांची रीघ लागली होती. लेनिनच्या मृतदेहाशेजारी ऋपस्काया बसून होती. आपल्या दुःखाचे प्रदर्शन होऊ नये यासाठी तिने आपले ओठ आवळून घेतले होते. तरीदेखील आवेग अनावर झाला की तिच्या ओठांवाटे हुंदका बाहेर पडे.

लेनिनचा चेहरा शांत दिसत होता. त्याला निवांत झोप लागली असावी असेच त्याच्या चेहऱ्यावरून दिसत होते. लेनिनचे अंत्यदर्शन घेताना आपल्याला काय वाटले हे नमूद करताना सोरिन लिहितो— 'लेनिन आपली सर्व शक्ती एकवटून

पुन्हा उभा राहील असा मला क्षणभर भास झाला.'

लेनिनच्या निधनाची बातमी क्रेमलिनला कळविण्यात आली तेव्हा झिनोव्हेह आपल्या कचेरीत बसला होता. ही बातमी आपल्याला केव्हा तरी ऐकावी लागणार याची त्याला कल्पना होती. परंतु लेनिनचे इतक्या लवकर निधन होईल असे त्याला मुळीच वाटले नव्हते. समोरचा कागद पुढे ओढून झिनोव्हेव्हने लिहिले 'लेनिनचे निधन झाले आहे, हे आताच मला टेलिफोनवरून सांगण्यात आले. त्याच्या अंत्यदर्शनासाठी तासाभरातच आम्ही गोर्कीला जात आहोत. बुखारिन, टोमस्की, कालिनिन, स्टॅलिन आणि कामेनेव्ह हे माझ्याबरोबर येतील. रिकोव्ह आजारी असल्यामुळे त्याला आमच्याबरोबर येणे शक्य होणार नाही. लेनिन जिवंत असताना त्याचा निरोप आला की, आम्ही सारेजण गोर्कीला धावत जात असू. आजही आम्ही असेच धावत जाणार आहोत. पण आतापर्यंतच्या धावपळीत आणि आजच्या धावपळीत एक महत्त्वाचा फरक आहे. त्या वेळी गोर्कीला पोचले की आम्हाला आमचा आधार गवसायचा. आज– !'

कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे झिनोव्हेव्हप्रभृति सहा नेते गोर्कीला जाऊन रात्री बाराच्या सुमाराला मॉस्कोला परतले. त्यानंतर दोन वाजता केंद्रीय कार्यकारिणीची बैठक सुरू होऊन अर्धा तास झाला तरी कोणाच्याच तोंडून शब्द बाहेर पडेना. त्यानंतर एक एक जण उठून आपल्या दिवंगत नेत्याला श्रद्धांजली वाहत होता. सकाळपर्यंत ही बैठक चालू होती. लेनिनचा मृत्यू अनपेक्षित नसला तरी सोव्हिएट राजवटीला आतापर्यंत एवढा जबरदस्त हादरा कधीच बसला नसल्यामुळे सारेजण भांबाऊन गेले होते.

लेनिनच्या निधनामुळे रशियाच्या राजकीय वातावरणामध्ये अकस्मात पोकळी निर्माण झाली होती. ही पोकळी भरून काढण्याचा जो तो आपापल्या परीने प्रयत्न करणार होता. पण आज तरी सारेजण विमनस्क दिसत होते.

आपण पोरके झालो आहोत या भावनेने सर्वांना घेरून टाकले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता लेनिनच्या शवाची उत्तरीय तपासणी सुरू झाली. दहा डॉक्टरांच्या उपस्थितीत सुरू झालेली ही तपासणी सहा तास चालू होती. लेनिनचे शरीर फाडण्यात आले तरीही तो नेमका कोणत्या रोगाने मरण पावला याचे निदान होईना. हृदय, फुप्फुसे आदी सर्व महत्त्वाच्या इंद्रियांमध्ये कोणताच विकार आढळून आला नाही. त्याच्या डाव्या खांद्यातील गोळी बाहेर काढण्यात आली. या गोळीमुळे त्याच्या डाव्या फुप्फुसाला ओरखडा गेल्याचे दिसत होते. परंतु या ओरखड्याचा मृत्यूशी काहीही संबंध नाही असे डॉक्टरांचे मत पडले. लेनिनचे पोट रिकामे होते आणि आतडीही व्यवस्थित होती. सामान्यत: मृत माणसाचे पोट रिकामी आढळत नाही. परंतु लेनिनच्या बाबतीत तसे घडले होते. यामुळे पोटातील पदार्थांचे रासायनिक पृथ:करण करून मृत्यूच्या कारणाचे

निदान करण्याची संधीही सापडली नाही.

यानंतर लेनिनच्या डोक्याची चिरफाड करण्यात आली. पक्षाघाताच्या विकाराच्या खुणा मेंदूमध्ये आढळून आल्या असल्या तरीदेखील मेंदूतील रक्तस्राव बंद पडल्यामुळे त्यास मृत्यू आला असे सिद्ध होत नव्हते. परंतु तेच तात्कालिक कारण घडले असावे. कारण याव्यतिरिक्त डॉक्टरांना दुसरा कोणताच निष्कर्ष काढता येणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यानी २२ जानेवारी रोजी सायंकाळी जे पत्रक प्रसिद्ध केले त्यात असे म्हटले होते की, '२१ जानेवारीच्या सकाळपासून लेनिनची प्रकृती एकदम बिघडली. सायंकाळी ५॥ वाजल्यापासून त्याला श्वास घ्यायला खूपच त्रास होऊ लागला आणि सहा वाजून पन्नास मिनिटांनी त्याचे निधन झाले. आज दुपारी करण्यात आलेल्या उत्तरीय तपासणीनुसार मेंदूतील रक्तस्राव हेच त्याच्या मृत्यूचे तात्कालिक कारण घडले असावे असे आमचे मत आहे.'

लेनिनचा मृत्यू झाल्यानंतर सोळा तासांनी त्याच्या मृत देहाची उत्तरीय तपासणी का करण्यात आली असा एक प्रश्न या संदर्भात विचारला जातो. कदाचित क्रेमलिनमधून परवानगी येईपर्यंत तेवढा वेळ गेला असावा एवढेच या प्रश्नाचे उत्तर देता येईल. माणूस मरण पावल्यानंतर लगेच त्याच्या शरीराची तपासणी केली तर त्याच्या मृत्यूच्या कारणांचे अचूक निदान करता येते. लेनिनवर जर विषप्रयोग करण्यात आला असेल तर या विषप्रयोगाच्या साऱ्या खुणा सोळा तासांच्या अवधीत नाहीशा होऊ शकतात, असे उत्तरीय तपासणीला एवढा वेळ का लागला असा प्रश्न विचारणाऱ्यांचे म्हणणे आहे.

लेनिन दोन-चार महिन्यांत खडखडीत बरा होईल असे डॉ. फोरस्टर यांनी सकाळी सांगितले आणि त्यानंतर बारा तासांच्या आतच लेनिनचे निधन झाले. यामुळे त्याच्यावर विषप्रयोग झाला असावा आणि तोहि स्टॅलिननेच करविला असावा असे मानणारा एक मोठा गट त्या वेळी कम्युनिस्ट पक्षात अस्तित्वात होता. लेनिनची त्याच्या शारीरिक वेदनांपासून मुक्तता करण्यासाठी स्टॅलिनने हा क्रूर मार्ग अवलंबला असावा असे स्टॅलिनचे समर्थक त्या वेळी प्रतिवाद करीत असत. परंतु शारीरिक वेदनांना कंटाळून आपण मृत्युला जवळ करावे अशी त्या वेळी लेनिनची मन:स्थिती होती असा कोणताच पुरावा उपलब्ध नाही.

२२ जानेवारी रोजी सोव्हिएट सरकारने जे पत्रक प्रसिद्ध केले त्यात स्पष्ट म्हटले होते की, 'लेनिनचा आकस्मिक मृत्यू का झाला यासंबधी कोणतेच स्पष्ट कारण सापडलेले नाही. उलटपक्षी गेल्या काही दिवसांपासून त्याच्या प्रकृतीत सुधारणा व्हायला लागली होती आणि यापुढेही त्याची प्रकृती सुधारत जाईल अशीच चिन्हे दिसत होती. परंतु एकाएकी काल सायंकाळी त्याची प्रकृती बिघडली आणि तासाभराच्या आतच त्याचा अंत झाला, डॉ. एलिस्ट्रॅटोव्ह लिहितात, '२१ जानेवारीच्या सकाळपासून लेनिनला किंचित अशक्तता जाणवू लागली होती ही गोष्ट

खरी असली तरी तो आजच निधन पावेल असे आम्हांला मुळीच वाटले नव्हते.' लेनिनच्या अखेरच्या काळात त्याच्यावर उपचार करणारे डॉ. फोरस्टर म्हणतात, 'लेनिनचा मृत्यू सर्वस्वी अनपेक्षित होता. सायंकाळी सहा वाजता त्याची शुद्ध हरपली आणि त्यानंतर पन्नास मिनिटांच्या आतच त्याचे निधन झाले.'

इतिहासाला कलाटणी देण्यासाठी धडपडणाऱ्या लेनिनसारख्या मोठ्या व्यक्ती जेव्हा आकस्मिक रीतीने निधन पावतात तेव्हा साहजिकच त्यांच्या या आकस्मिक मृत्युमागे काही तरी रहस्य दडले असले पाहिजे असेच मानले जाते. रशियाच्या राज्यकर्त्यांपैकी फारच थोड्या जणांना नैसर्गिक मृत्यू आला. विषप्रयोग, दारू-गोळ्याचा स्फोट, सुरामारी, बंदुकीचा बळी, फाशी, अशाच मार्गाने रशियाचे बरेचसे राज्यकर्ते या जगातून अकस्मात उठले. लेनिनचा मृत्यूही असाच आकस्मिक होता. लेनिनच्या मृत्युसंबंधी गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांत अनेक कारणे प्रसिद्ध झाली आहेत. लेनिनच्या मृत्यूनंतर दहा दिवसांनी म्हणजे ३१ जानेवारी रोजी 'प्रावदा'-मध्ये डॉक्टरांचे पत्रक प्रसिद्ध करण्यात आले. तत्पूर्वी बोरिस वोलीन आणि मिखाईल कोल्टझोव्ह यांनी २६ जानेवारी रोजी 'लेनिनला कशाने मृत्यू आला?' या नावाची पुस्तिका प्रसिद्ध केली होती. त्यात डॉक्टरांच्या व लेनिनच्या परिवारातील काही व्यक्तींच्या मुलाखती व उत्तरीय तपासणीचा अहवाल अंतर्भूत करण्यात आला होता. यानंतर कालांतराने क्रपस्काया, मारिआ, लेनिनवर औषधोपचार करणारे डॉक्टर, त्याच्या घरातील नोकर, वरिष्ठ सरकारी अधिकारी व पक्षनेते यांच्या लेनिनविषयक आठवणी प्रसिद्ध होऊ लागल्या आणि त्यांत लेनिनच्या आकस्मिक मृत्युसंबंधी आश्चर्य व्यक्तविण्यात आलेले आहे.

लेनिनवर औषधोपचार करणारे डॉ. रोझानोव्ह, डॉ. फोरस्टर, डॉ. ऑरबाख प्रभृति सर्व डॉक्टर लेनिनची प्रकृती सुधारत असून मे महिन्यापर्यंत तो पूर्णपणे बरा होईल अशी ग्वाही देत होते. लेनिन हळूहळू पुन्हा चालायला आणि बोलायला लागला आहे यासंबंधी ते आनंद व्यक्त करीत होते. डॉक्टर मंडळी केवळ इतरांची समजूत घालण्यासाठी असे म्हणत होते ही गोष्टही खरी नाही. कारण सदैव लेनिन-भोवती वावरणारी त्याची पत्नी क्रपस्काया आणि बहीण मारिआ यांनीही लेनिनची प्रकृती सुधारत असल्याची साक्ष दिलेली आहे. लेनिनने आपल्या अखेरच्या दिवसांत डॉक्टरांना फारसे जुमानले नाही गोष्ट खरी असली तरी आपल्या पत्नीचे आणि बहिणीचे आदेश मात्र तो निमूटपणाने पाळत असे. आपल्यावर विषप्रयोग केला जाण्याचा संभव आहे या भीतीमुळेच अखेरच्या दिवसात लेनिन क्रपस्काया, मारिआ आणि एकदोन विश्वासू नोकर यांच्याव्यतिरिक्त इतर कोणालाही आपल्या खोलीत येऊ देत नसे, असे डॉ. रोझानोव्ह यांनी सूचित केले आहे. लेनिनच्या प्रकृतिसंबंधीचा अहवाल दररोज क्रेमलिनमध्ये धाडला जात होता आणि ही गोष्टही लेनिनला माहीत होती. एकदा लेनिन जेवायला बसला असताना शेजारच्या टेबला-

वरची क्विनाइनची बाटली हातात घेत ' हे पाहा विष ' असे ओरडला आणि हसत हसत त्याने ती बाटली खाली ठेवली हा प्रसंगही डॉ. रोझानोव्ह यांनी नमूद केला आहे.

'मला विष दे' असे १९२३ च्या फेब्रुवारीमध्ये स्वत: लेनिननेच स्टॅलिनला सांगितले होते असे ट्रॉटस्कीने १९३५ मध्ये म्हणजे लेनिनच्या मृत्युनंतर चौदा वर्षांनी लिहिले आहे. ट्रॉटस्की लिहितो–' १९२३ च्या फेब्रुवारीत किंवा मार्चच्या अखेरीस लेनिनचा आजार बळावला तेव्हा त्याने स्टॅलिनला बोलावून घेतले आणि या यातनातून सोडविण्यासाठी मला विष दे, अशी त्याला विनंती केली. आपली वाचाशक्ती जाण्यापूर्वी आपण या जगातून नाहीसे व्हावे अशी लेनिनची इच्छा होती. पंगू होऊन अंथरुणावर कुजत पडण्यापेक्षा मृत्यू बरा असे लेनिन मानत होता.'

ट्रॉटस्कीच्या अंदाजानुसार स्टॅलिनने यासंबंधी आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा केली. लेनिनला खरोखर विष घ्यायचे नसून तो केवळ तुझी परीक्षा पाहत आहे असे सहकाऱ्यांनी सांगितल्यामुळे स्टॅलिनने लेनिनची विनंती अमान्य केली. स्टॅलिननेच लेनिनवर विषप्रयोग केला असे जरी ट्रॉटस्कीला सुचवायचे असले तरी त्या बाबतीत त्याने पुरावा दिलेला नाही.

मग प्रश्न असा उरतो की १९२३ च्या फेब्रुवारीमध्ये स्टॅलिनने लेनिनवर विषप्रयोग केला नाही तर त्यानंतर अकरा महिन्यांनी स्टॅलिननेच हा प्रयोग केला का?

लेनिनच्या मृत्युनंतर तीस वर्षांनी म्हणजे १९५५ मध्ये लेनिनच्या निधनामागील रहस्यावर प्रकाश टाकणारा पुरावा प्रसिद्ध झालेला आहे. १९३५ मध्ये सर्जी किरोव्ह याच्या खुनाबाबत पकडलेल्या एलिझाबेथ लेर्मोलो हिने ' फेस ऑफ ए व्हिक्टिम ' या नावाचे आत्मवृत्त प्रसिद्ध केले आहे. किरोव्हला ठार करणाऱ्या लिओनिड निकोलायेव्हशी एलिझाबेथचा परिचय होता. आणि त्यामुळेच किरोव्हच्या खुनानंतर जी धरपकड झाली त्या वेळी एलिझाबेथलाही तुरुंगवास सहन करावा लागला. निरनिराळ्या प्रसंगांत मिळून तिने एकंदर आठ वर्षे शिक्षा भोगली. तुरुंगात असताना एलिझाबेथची आणि गाव्हरिल व्होल्कोव्ह या जुन्या बोल्शेव्हिकाशी गाठ पडली.. लेनिन गोर्की येथे राहायला गेल्यानंतर व्होल्कोव्ह तेथे मुदपाकखान्याचा प्रमुख म्हणून काम पाहत असे.

२१ जानेवारी १९२४ रोजी गोर्की येथील लेनिनच्या निवासस्थानी काय घडले यासंबंधीची कहाणी व्होल्कोव्हने एलिझाबथ लेर्मोला हिला कथन केली आणि ती तिने आपल्या आत्मचरित्रात नमूद केली आहे. एलिझाबेथ लिहिते–' २१ जानेवारी १९२४ रोजी सकाळी अकरा वाजता व्होल्कोव्ह दुसऱ्यांदा न्याहारी घेऊन लेनिनच्या खोलीत गेला. त्या वेळी तेथे दुसरे कोणी हजर नव्हते. व्होल्कोव्हला पाहताच लेनिनने उठण्याचा प्रयत्न केला. लेनिनला आधार देण्यासाठी व्होल्कोव्ह पुढे होताच लेनिनने त्याच्या हातात एक चिठ्ठी दिली. व्होल्कोव्हने ती चटकन खिशात ठेवून

लेनिनला उठवून बसण्याचा प्रयत्न केला. आतली ही गडबड ऐकून डॉ. एलिस्ट्रॅटोव्ह आत आले आणि त्यांनी व्होल्कोव्हच्या मदतीने लेनिनला अंथरुणावर झोपविले. लेनिनला झोप यावी म्हणून डॉ. एलिस्ट्रॅटोव्ह यांनी त्याला इंजेक्शन दिले. इंजेक्शन घेतल्यानंतर लेनिनची हालचाल थंडावली. त्याचे डोळे अर्धवट मिटले होते. त्यानंतर ते त्याने पुन्हा कधीच उघडले नाहीत. आपल्या खोलीत आल्यानंतर व्होल्कोव्हने लेनिनची चिठ्ठी वाचली. त्या चिठ्ठीत लेनिनने लिहिले होते, 'व्होल्कोव्ह, माझ्यावर विषप्रयोग झाला आहे......तावडतोब क्रपस्कायाला बोलावून घे...... ट्रॉटस्कीला कळव....ज्याला ज्याला कळविणे शक्य आहे, त्या प्रत्येकाला ही गोष्ट सांग.' व्होल्कोव्ह पुढे म्हणाला, 'या घटनेसंबंधी मी जेव्हा विचार करू लागतो तेव्हा मला दोन प्रश्न सतावत असतात. एक तर लेनिनने मला चिठ्ठी दिली ही गोष्ट डॉ. एलिस्ट्रॅटोव्ह यांनी पाहिली की नाही आणि त्यांनी जर ही गोष्ट पाहिली असेल तर त्यांनी स्टॅलिनला यासंबंधी सांगितले असेल काय या दोन प्रश्नांनी माझी झोप उडविली आहे. कारण माझी जर शंका खरी असेल तर मग माझ्या जिवाला


काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

कधी तरी अपाय होणार अशी मला भीती वाटत आली आहे. डॉ. एलिस्ट्रॅटोव्ह यांनी लेनिनला इंजेक्शन दिल्यानंतर थोड्या वेळाने मी त्यांना मुद्दामच भेटायला गेलो. पण ते माझ्याशी काहीच बोलले नाहीत. लेनिनने मला चिठ्ठी दिली हा प्रकार त्यांना कदाचित माहीत असेल. कदाचित माहीत नसेलही. परंतु त्यानंतर डॉ. एलिस्ट्रॅटोव्ह मला कधीच भेटले नाहीत.'

व्हाल्कोव्हने आपल्याला काय सांगितले हे एलिझाबेथ लेर्मोलो हिने निःसंदिग्ध शब्दांत लिहून ठेवले आहे. परंतु व्होल्कोव्हने तिला जे सांगितले ते तरी सत्य आहे असे कसे मानता येईल ? म्हणून लेनिनवर विषप्रयोग झाल्याबाबतचा व्होल्कोव्हचा पुरावाही विश्वासार्ह मानता येत नाही.

१९२४ मध्ये गोर्की येथे गुप्त पोलिस म्हणून वावरत असलेल्या अ‍ॅलेक्झांडर बेल्मास याने लेनिनच्या अखेरच्या दिवसांसंबंधी जे लिहून ठेवले त्यालाही विशेष महत्त्व आहे. कारण बेल्मासची लेनिनचा पहारेकरी म्हणून झेझिन्स्कीनेच १९२३ च्या अखेरीस मुद्दाम नेमणूक केली होती. बेल्मास लिहितो--

१९ जानेवारी १९२४-- लेनिनच्या निवासस्थानी मी रात्रीच्या पहाऱ्यावर होतो. सकाळच्या वेळी मी घरी जाईपर्यंत लेनिन न्याहारीसाठी आपल्या शयनगृहातून बाहेर आला नव्हता. मी घरी जाण्याच्या तयारीत असताना पाकाल्न तेथे आला आणि म्हणाला, ' लेनिनला आज बरं वाटत नाही आणि त्यामुळे तो बाहेर पडणार नाही.' त्यानंतर थोड्या वेळाने डॉ. फोरस्टर यांना फोन करून बोलावून घे असे मारिआने मला सांगितले. ऋपस्काया आणि मारिआ यांच्या चेहऱ्यावरची काळजी मला स्पष्ट दिसत होती. मॉस्कोहून लेनिनच्या प्रकृतिसंबंधी चौकशी करणारे फोन सारखे येत होते.

२० जानेवारी--रात्री एक वाजता लेनिनची शुद्ध हरपली. तावडतोब डॉक्टरांना बोलावण्यात आले. लेनिनवर कोणते उपचार केले पाहिजेत, यांसंबंधी डॉक्टरांची चर्चा चालू असतानाच लेनिन शुद्धीवर आला. परंतु त्याला कमालीचा अशक्तपणा वाटत होता. कालपासून त्याने काहीच खाल्लेले नाही.

२१ जानेवारी--लेनिनच्या प्रकृतीसंबंधी चौकशी करणारे फोन सकाळपासून येत होते. ऋपस्काया, मारिआ आणि डॉक्टर सदैव लेनिनच्या खोलीत बसून होते. एकदम रडत रडत मारिआ बाहेर आली आणि म्हणाली, ' लेनिन आपल्याला सोडून गेला आहे.' ती तशीच लेनिनच्या खोलीकडे धावत गेली. या बातमीवर माझा विश्वास बसेना. छे, असे कसे घडणे शक्य आहे ! लेनिन जिवंत असलाच पाहिजे. डॉक्टरांकडून काहीतरी गफलत झाली असली पाहिजे. एवढ्यात मॉस्कोहून कुणाचा तरी फोन आला. मी सांगितले, ' लेनिन जिवंत आहे.' यानंतर एकसारखे फोन येत होते. ' लेनिनचे कसे आहे ?' हा ठराविक प्रश्न ऐकू येताच मी ठराविक उत्तर देत होतो--' लेनिन जिवंत आहे.' थोड्या वेळाने पाकाल्न माझ्याजवळ आला आणि

म्हणाला, ' सगळ्यांना सांग की, लेनिन मरण पावला आहे. ' मी बाहेर आलो आणि तेथे जमलेल्या गावकऱ्यांना सांगितले, ' लेनिनचे निधन झाले आहे. '

२० जानेवारीच्या रात्रीपासून लेनिनची शुद्ध हरपली होती, ही गोष्ट एकट्या बेल्मासनेच नमूद केली आहे. इतकेच नव्हे तर, १९ जानेवारीपासून लेनिनची प्रकृती चिंताजनक झाली होती आणि काहीतरी विपरीत घडणार आहे, याची ऋपस्काया आणि मारिआ यांना कल्पना आलेली होती, असे बेल्मासच्या वृत्तान्तावरून कळते. लेनिनच्या प्रकृतीसंबंधी चौकशी करणारे फोन मॉस्कोहून सतत येत होते, हेही बेल्मासने लिहून ठेवले आहे. लेनिनची प्रकृती सुधारत आहे, असे डॉक्टर सांगत असताना लेनिन जिवंत आहे की नाही याची चौकशी करणारे फोन यावेत, यावरून लेनिनचा मृत्यू जवळ आला आहे, हे मॉस्कोतील काही व्यक्तींना नक्की ठाऊक असले पाहिजे, हेच यावरून सिद्ध होते.

परंतु ही गोष्ट नेमकी कोणाला ठाऊक होती, याचा बेल्मासने कोठेच उल्लेख केलेला नाही.

हे सर्व पुरावे पाहता एवढाच निष्कर्ष काढता येईल की, लेनिनचा खून करण्याचा ज्याने कोणी विचार केला असेल त्याने आपला बेत १५ जानेवारीच्या सुमारास पक्का केला असावा. कारण दुसऱ्या दिवशी ट्रॉटस्की मॉस्कोहून बाहेरगावी जाणार आहे, हे सगळ्यांना ठाऊक होते. त्या प्रमाणे १६ जानेवारीला ट्रॉटस्कीने मॉस्कोहून प्रयाण केले. लेनिनवर विषप्रयोग करण्याचा पहिला प्रयोग १९ जानेवारी रोजी झाला असावा. कारण त्या दिवसापासूनच मॉस्कोहून लेनिनच्या प्रकृतीसंबंधी विचारणा करणारे फोन सारखे येऊ लागले होते. परंतु १९ व २० जानेवारी या दोन दिवशी हा प्रयत्न फसला असावा. कारण १९ जानेवारीपासून त्याने काहीच खाल्ले नव्हते. २१ जानेवारी रोजी लेनिनने जो चहा घेतला त्यातून त्याला विष दिले गेले असावे. कारण त्यानंतर त्याच्या शरीराची हालचाल थंडावत चालल्याचे डॉक्टरांना आढळून आले. विषप्रयोग झालाच असेल तर असे काही तरी घडले असावे

लेनिनवर खरोखरच विषप्रयोग करण्यात आला किंवा नाही, यासंबंधी निश्चित माहिती कोणीच सांगू शकत नाही. राष्ट्रनेत्यांचे जेव्हा आकस्मिक रीतीने मृत्यू होतात, तेव्हा त्यांच्या मृत्युच्या कारणासंबंधी संपूर्ण सत्य कधीच बाहेर येत नाही. गूढतेच्या धूसर वलयातच अशा निधनांची कारणमीमांसा गुरफटून गेलेली असते. लेनिनच्या बाबतीतही असेच घडले आहे.

इतिहासाने एवढीच नोंद केली आहे की, ' जगातील पहिल्या साम्यवादी राजवटीचा संस्थापक लेनिन, गोर्की येथे २१ जानेवारी १९२४ रोजी सायंकाळी सहा वाजून पन्नास मिनिटांनी निधन पावला. '

स्टॅलिन वाट पाहत होता तो याच बातमीची. दैवाचा फासा त्याच्या बाजूने पडला होता.

[ क्रमशः ]



# मॉन्टीज डबल

जिब्राल्टरला आलेला खुद्द माँटीच आहे, अशी त्या उद्योगपतींची पक्की खात्री पटली होती. त्यांनी पाठविलेल्या अहवालांवरून कॅनारिसने माँटोचा काटा काढण्याचा निर्णय घेतलादेखील होता. परंतु हिटलरने तो फेटाळून लावला. माँटी अंतिम मोहिमेचे मोर्चे कोठे लावतो, हे कळणे हिटलरला माँटीच्या मृत्यूपेक्षा अधिक महत्त्वाचे वाटले.

ते स्पॅनिश हेर त्वरित कामाला लागले होते. त्यांनी मिळविलेली बहुमोल माहिती, सरकारी भवनातून बाहेर पडल्यापासून अवघ्या दोन तासांत माद्रिदला पोहोचली. संध्याकाळी ती बर्लिनला गेली. तत्काळ क्रमांक तीनशे-तीनच्या योजनेवर डोकेफोड सुरू झाली. त्या योजनेला सर्वाधिक महत्त्व देण्यात आले. जेम्सचे कष्ट चांगलेच फलद्रूप झाले होते. त्याची माँटीची भूमिका विलक्षण परिणामकारक होत होती.

*विमानाकडे जाताना ठरल्याप्रमाणे जेम्सने एक हातरुमाल खाली टाकला. अंदाज बरोबर ठरला. तोच रुमाल प्रो. सेरेनींना मृत्यूचा फास ठरला.*



राज्यपाल सर राल्फ त्या दोघा उद्योग-पतींना घेऊन आत गेले. जेम्स थोडा वेळ तेथेच रेंगाळला. त्याने वर पाहिले, तो दुर्बीणवाला कामगार, काम करण्याचा देखावाही न करता, सरळ त्याच्याकडे पाहात होता, जेम्सला वाटले, दोस्तांच्या विजयामध्ये तोदेखील आपला चिमुकला वाटा उचलीत आहे !

लवकरच जेम्स आत गेला आणि सरळ सरसाहेबांच्या अभ्यासिकेत जाऊन बसला. काही वेळाने सरसाहेब आले. जेम्सला पाहताच त्यांना हसू फुटले. ते म्हणाले, " तू आणि मी चुकीचा व्यवसाय निवडला असं मला वाटत. आपण खरे गुप्त-हेरखात्यातच असायला पाहिजे होतो. खरं की नाही ? "

## अनुवाद – अनंत भावे

## ७

" त्यांना आपला संशय आला असेल काय ? " जेम्सने विचारले.

" शक्यच नाही. तू तीनशेतीन क्रमांकाच्या योजनेचा उल्लेख केलास तेव्हा चेहरे कसे झाले पाहिलेस त्यांचे ? "

" हो. पण मला तर त्यांची पापणीसुद्धा हललेली दिसली नाही. "

" तुझी चूक होते आहे जेम्स. त्यांना झालेला अत्यानंद मला तर स्पष्ट दिसला. माझ्यासारखं काम तुला करावं लागलं असतं तर माणसाचे चेहेरे बारकाईनं न्याहाळण्याची सवय आपोआप लागली असती तुला. पुसट हालचाल, स्नायूवर पडलेला ताण यामुळं तुम्हाला समोरच्या माणसाची प्रतिक्रिया सहज अजमावता येते. "

राज्यपाल सर राल्फ आणि जेम्स जवळजवळ तासभर गप्पा मारीत होते. त्या दोन स्पॅनिश उद्योगपतींबरोबर योजलेली मुलाखत कशी काय पार पडते या विचाराचे दडपण आता उरले नव्हते. सर राल्फना आपल्या अभिनयकौशल्याचा किंचित अभिमान वाटू लागला होता. त्याचबरोबर जेम्सचीही ते मुक्तकंठाने स्तुती करीत होते.

या मोहिमेचे महत्त्व जेम्सपेक्षा सर राल्फना अधिक माहीत होते. माँटीच्या जिब्रॉल्टर येथील आगमनाची वार्ता अल्पावधीत जर्मन अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचणार होती. त्यांचा बुद्धिभेद होणार होता. जेम्सच्या कामगिरीमुळे हजारो दोस्त सैनिकांचे प्राण कसे वाचतील, युद्धसमाप्ती नजीक कशी येईल, मग त्याचा सरकारी सन्मान कसा होईल, याचे मोठे रसपूर्ण वर्णन सर राल्फनी केले.

जेम्सच्या कामगिरीमुळे पहिल्या दोन गोष्टी जरूर साधल्या. पण सरकारी सन्मानाचे गणित मात्र चुकलेच. पण जेम्सला त्याबद्दल खेद वाटत नाही. जिवंत राहिलो हेच पुष्कळ झाले असे म्हणतो तो.

## योजना क्रमांक ३०३

सर राल्फनी पुढील योजना समजावून सांगायला सुरवात केली :

" आता तुला अल्जियर्सला जायचंय, आणि तेसुद्धा लवकरात लवकर. तुझ्या जिब्राल्टरला येण्याची इतकी प्रसिद्धी झाली आहे की अल्जियर्सला तुझं इथल्यापेक्षा प्रचंड स्वागत होईल, " त्यांनी फोन करून फोले व हेवुड यांना बोलावून घेतले त्यानंतर जिब्रॉल्टरच्या विमानतळावरील निरोपाची तालीम घेण्यात आली.

जिब्रॉल्टरमध्ये शत्रूचे अनेक हस्तक होते. [परंतु दोस्तांच्या गुप्तहेरखात्याला त्यांची चांगली माहिती होती. इतकेच नव्हे तर गुप्तहेरखात्याची त्या हस्तकांवर सतत पाळत होती. या गोष्टीची अर्थात शत्रू हेरांना कल्पना नव्हती. ते आपल्या वरिष्ठांकडे जे खलिते पाठवीत त्यांची दोस्त गुप्तहेरखाते बारकाईने छाननी करीत असे आणि मगच ते पुढे जाऊ देत असे. या शत्रूच्या हस्तकांच्या कानावर खोटी माहिती घालण्याची मोठी अवघड कामगिरी माँटीच्या भूमिकेत जेम्सला जिब्रॉल्टरच्या

विमानतळावर पार पाडायची होती.

विमानतळावर जाताना मोटारी मुद्दाम लांबच्या रस्त्याने नेण्यात आल्या. त्यायोगे अधिक माणसांना ' माँटी 'चे दर्शन झाले. रस्त्यारस्त्यांवर माँटीच्या नावाचा जय-जयकार चालला होता.

मोटार विमानतळावर पोहोचली. जेम्स मोटारीतून उतरला. नेहमीसारखा सलामीचा कार्यक्रम झाला. त्यानंतर जेम्सने सर राल्फ ईस्टवूड यांचा हात हातात घेतला आणि त्यांना बाजूला नेऊन त्यांच्याशी काही खास बोलण्याचे नाटक सुरू केले. बोलण्यात जिब्रॉल्टरचे बंदर, तेथील व्यवस्था, पंतप्रधान, युद्ध मंत्रिमंडळ, तीनशेतीन क्रमांकाची योजना इत्यादी विषय मुद्दाम पुन्हा पुन्न: आणले जात होते. त्यांना अनुरूप असे हावभाव, हातवारे, दिशादर्शन करीत होता.

विमानतळावरच्या उपाहारगृहातील एक परिचारक शत्रूचा हस्तक जेम्स होता, त्याच्या कानांवर ती माहिती पडावी एवढ्यासाठी सर राल्फना घेऊन जेम्स चालत चालत उपाहारगृहाच्या खिडकीखाली येई आणि बोलण्यात गढल्याचे दाखवून आवाज चढवी. इकडे त्या शत्रुहस्तकाने ती माहिती जिवाचे कान करून ऐकून घेतली !

ही माहिती बर्लिनला पोहोचल्यावर हिटलरचे गुप्तहेरखाते कसे डोके खाजवीत बसेल याचे चित्र जेम्सच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. तेवढ्यात विमानतळावर जमलेल्या नागरिकांच्या मेळाव्यात जेम्सला ते पूर्वपरिचित स्पॅनिश उद्योगपती दिसले. ही संधी जेम्सने सोडली नाही. सर राल्फना त्याने त्यांच्याजवळ नेले. या उद्योगपतींना अर्धवट ऐकू जाईल अशा बेताने जेम्सने सर राल्फना तीनशेतीन क्रमांकाच्या मोहिमेचा तपशील समजावून सांगितला. त्या वेळी खरे म्हणजे जेम्सला हसू येत होते.

जेम्सने सरसाहेबांचा निरोप घेतला आणि तो विमानात बसला. सर राल्फ त्याच्याकडे भारावल्यासारखे एकटक पाहात होते. माँटीचा तोतया नव्हे तर खराखुरा माँटीच येऊन गेला असे त्यांना अजूनही कदाचित वाटत असावे !

जिब्रॉल्टरपर्यंत सारे सुरळीत पार पाडले होते. योजनेचा तपशील आता हळूहळू जेम्सच्या ध्यानात येत होता. मोहिमेच्या सुरुवातीला एका गोष्टीची जेम्सला फार भीती वाटत होती. माँटीच्या भूमिकेत मोठमोठ्या सेनाधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष गाठ पडली तर काय करायचे ? काय बोलायचे ? त्यातही पुन्हा माँटीचे खास मित्र असले तर विचारायलाच नको. त्यांनी युद्धाबद्दल वरच्या पातळीवरून बोलणे चालू केले तर ? आणि ते नकली बोट ? त्याचे कसे व्हायचे ?

ब्रिटिश गुप्तहेरखात्याला या अडचणीची पुरेपूर कल्पना होती. म्हणूनच शत्रूच्या हस्तकांच्या नजरेला पडेल अशा रीतीने जेम्सची भ्रमंती चालू असली तरी त्याला जेवणखाण एकान्तातच करता येईल अशी काळजी गुप्तहेरखात्याने घेतली होती.

त्याचप्रमाणे माँटीशी परिचित असलेल्या सेनाधिकाऱ्यांच्या भेटी मोहिमेच्या आख-णीत कटाक्षाने टाळल्या होत्या.

जर्मनीविरुद्धच्या खऱ्या आक्रमक मोहिमेची तपशीलवार तयारी जेम्स जिब्रॉल्टरला येण्यापूर्वी कितीतरी दिवस झाली होती. त्यामुळे जनरल माँटगोमेरीने स्वतः वेगवेगळ्या ठिकाणांना भेट देण्याची काही खास आवश्यकता नव्हती. जेम्सवर कामगिरी होती ती माँटीच्या रूपात शत्रूला दर्शन देण्याची आणि त्याचा बुद्धिभेद करण्याची. त्यात शत्रूच्या हस्तकांच्या हातून खून होण्याचा धोका खचित होता. पण हा धोका पत्करला, इतक्या बड्या सेनाधिकाऱ्यांबरोबर युद्धनीतीवर बोलण्याची भीती जेम्सला वाटत होती. अभ्यास आणि तालीम करूनही ही गोष्ट कशी जमली असती ?

कशी कोणास ठाऊक, जेम्सला कर्नल लेस्टरची आठवण झाली. लेस्टर तिकडे लंडनमध्ये बसून मोहिमेची सूत्रे हलवीत होता. असामान्य बुद्धिमत्तेची माणसे, आपल्या कामासाठी, सर्वसामान्यांना, बुद्धिबळाच्या पटावरील प्याद्यांसारखी सरक-वतात, असे जेम्सने पुस्तकात वाचले होते. पण कधीकाळी आपल्यालासुद्धा आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटावरील एक प्यादे व्हावे लागेल याची कल्पना त्याने केली नव्हती. जिब्राल्टरचा प्रवेश संपला होता. कामाचा एक टप्पा गाठला होता. प्यादे पुढच्या घरात सरकवले जात होते !

जेम्स आता आपल्या आसनावर व्यवस्थित बसला. गेल्या अर्ध्या तसातील घटनापट आपल्या डोळ्यांसमोर आला. त्याला वाटले आपल्या हातून नकळत कोठे चुक तर झाली नाही ना ?

इतक्यात ब्रिगेडियर हेवुडने त्याला विचारले, " काय, कसला विचार करतो आहेस ?"

" काही नाही. माझी एखादी चूक झाली का हे आठवण्याचा प्रयत्न करतो आहे."

" खुळा आहेस तू. चूक तर झालीच नाही. पण तुझी भूमिका इतकी सुंदर झाली की विचारता सोय नाही. माझी खात्री आहे. आज रात्री बर्लिनमध्ये कित्येकांना डोकेदुखी होणार आहे. "

हेवुडचे बोलणे ऐकूनसुद्धा जेम्सची अस्वस्थता नाहीशी झाली नाही. जिब्रॉल्टरला येण्यापूर्वी या मोहिमेसाठी जेम्सला जिवाचा आटापिटा करावा लागला होता. माँटीची प्रत्येक लकब आणि वैशिष्टच त्याला लक्षात ठेवावे लागले होते. इतकेच नव्हे तर मोहिमेचा इतर तपशीलसुद्धा नीट अभ्यासावा लागला होता. आणि मौज अशी की माँटीची भूमिका वठविताना तो आत्यंतिक सहजतेने आणि आत्मविश्वासाने वावरत होता; पण पडद्यामागची ही मध्यंतरे मात्र त्याला मनस्ताप देत होती. नाटकातील मध्यंतरांपेक्षा ती कितीतरी निराळी होती. नाटकाच्या मध्यंतरांत तुम्ही इतर

नटमंडळींशी गप्पा मारता, कामाबद्दल उत्तेजक चर्चा करता. रंगभूमीचे वातावरणच असे आश्वासक असते की तुम्हांला आपोआप धीर येतो. आत्मविश्वास वाटतो. परंतु कोणत्याही अभिजात नटाने भूमिका करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी अशा एका महान प्रवेशात उत्कृष्टपणे भूमिका वठवून जेम्स नुकताच पडद्याआड गला होता; आणि प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त जयजयकाराऐवजी त्याला फक्त विमानाचा घरघराट ऐकावा लागत होता !

## नव्याप्रवेशाची तयारी

अल्जियर्समध्ये फ्रेंच आणि इटालियन नागरिकांच्या स्वरूपात शत्रूचे अनेक हस्तक वावरत होते. दोस्तांच्या गुप्तहेरखात्याचे त्यांच्यावर चांगले लक्ष होते. माँटीच्या मोहिमेची जाहिरात गुप्तहेरखात्याने मोठ्या कौशल्याने केलेली होती. जनरल माँटगोमेरीच्या नेतृत्वाखाली इंग्लंड व अमेरिका यांच्या संयुक्त फौजा फ्रान्समधील भूमिगत चळवळीच्या मदतीने जर्मनव्याप्त फ्रान्सवर दक्षिणेकडून आक्रमण करण्याची शक्यता असून त्यासाठीच माँटीचे आगमन होणार आहे, अशी बातमी पसरविण्यात आली होती. साहजिकच जर्मन गुप्तहेरांनी माँटीच्या आगमनाकडे आपले डोळे लावले होते.

फ्रान्सच्या दक्षिण-मोहिमेची ऐकीव बातमी खरीच आहे अशी जर्मन हेरांची खात्री पटणे जेम्सच्या हिकमतीवर अवलंबून होते.

माँटीच्या आगमनाची वार्ता काही खास निवडक जर्मन गुप्तहेरांना कळवूनही तिच्याभोवतीचे गुप्ततेचे वलय कायम राहील अशी काळजी दोस्त गुप्तहेरखात्याने घेतली होती. कारण जाहीर स्वरूपाच्या माँटीच्या आगमनाने जर्मनांना संशय आला असता. ज्या जर्मन गुप्तहेरांना माँटीला पाहण्याची, ऐकण्याची, त्याच्याजवळ जाण्याची संधी मिळाली ती दोस्तांच्या गाफीलपणामुळे, निष्काळजीपणामुळे मिळाली असा भास उत्पन्न करण्यात आला होता.

माँटीचे विमान अल्जियर्सच्या विमानतळावर घिरट्या घालू लागले. जेम्स नव्या प्रवेशासाठी सिद्ध झाला. तेव्हा ब्रिगेडियर हेवुडने त्याच्या हातात माँटीचे दोन फोटो दिले. त्या फोटोंवर जनरल माँटगोमेरीने स्वत: सही केली होती. जेम्सचा प्रश्नार्थक चेहरा पाहून हेवुडने स्पष्टीकरण केले. अल्जियर्समध्ये ब्रिटिशांप्रमाणे अमेरिकन फौजा-देखील होत्या. अमेरिकन फौजांमध्ये काही स्त्रिया ड्रायव्हर्सचे काम करीत होत्या. मोठ्या माणसांची स्वाक्षरी आणि फोटो मागण्याचे वेडच अमेरिकन स्त्रियांना असते, हे ब्रिटिश गुप्तहेरखात्याला माहीत होते. अशा एका ललनेने जेम्सजवळ फोटो आणि सही मागितली तर ? जेम्सचे अक्षर माँटीच्या अक्षरापेक्षा अगदी वेगळे होते. त्याने सारा घोटाळा झाला असता. तो टाळावा एवढ्यासाठीच दूरदृष्टीने माँटीचे त्याच्या सहीसुद्धा फोटो जेम्सकडे सुपूर्द करण्यात आले होते !

विमान तळावर उतरले. दरवाजा उघडला. जेम्सने बेरेट सारखी केली आणि आल्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी तो खाली उतरला. सलामीचा, आता जेम्सला चांगला परिचय असलेला, नेहमीचा कार्यक्रम पार पडला.

## अल्जियर्समधील चित्तथरारक अनुभव

जेम्स आपल्या मोटारकडे निघाला तेव्हा मध्येच त्याची एका फ्रेंच मेजरशी ओळख करून देण्यात आली. हा मेजर जर्मनांचा गुप्तहेर होता आणि ब्रिटिशांशी मैत्रीचा देखावा करीत होता. हे अर्थात ब्रिटिशांना ठाऊक होते. जेम्सलासुद्धा त्याबद्दल आगाऊ कल्पना दिलेली होती. इतका खुनशी आणि पाताळयंत्री चेहरा जेम्सने अजूनपर्यंत पाहिलेला नव्हता. त्याच्याशी काही जुजबी संभाषण करून 'माँटी' निघाला. इतक्यात विमानतळावर एका बाजूला, जरा दूर, सैनिकांची एक तुकडी उभी असल्याचे त्याला दिसले. त्यांच्याकडे आपले दुर्लक्ष झाले असे 'माँटी' ला वाटले. हात पाठीमागे गुंफून 'माँटी' त्या दिशेने निघाला. जवळ जाताच जेम्सच्या लक्षात आले की ही फ्रेंच फॉरीन लिजन तुकडी आपल्यासाठी उभी नाही. पण आता मागे परतणे योग्य दिसले नसते. जेम्सने माँटीचा सुप्रसिद्ध सलाम ठोकला. त्या तुकडीने त्याला मोठ्या उत्साहाने सलामी दिली. जेम्स परत आला तेव्हा हेवुड म्हणाला, "या खेपेला तू अगदी कमाल केलीस. तुझा दिमाख काही और होता. तुझ्यासाठी मुळी ती तुकडी उभीच नव्हती. ती होती थोड्या वेळानं येणाऱ्या फ्रेंच जनरलसाठी !"

जेम्सला हसू आले. हेवुड म्हणाला, "आपल्या जाण्याचीसुद्धा गंमतच झाली आहे. आपल्या जाण्याची व्यवस्था अमेरिकन अधिकाऱ्यांनी केली आहे. बघ तुला टाळायचं असेल ते तर दुसरी व्यवस्था करू आपण."

हा वेळपर्यंत जेम्सच्या अंगात माँटी इतका भिनला होता की त्याने ताडकन उत्तर दिले, "दुसरी व्यवस्था ? कशाला ? जाऊ आपण त्यांच्याबरोबर."

जवळच अमेरिकन मोटारींची एक रांग उभी होती. त्यांतील पहिल्या भपकेबाज मोटारीजवळ एक नखरेल अमेरिकन ललना ड्रायव्हरच्या गणवेषात उभी होती. तिने जेम्सला सलाम केला आणि घाईघाईने म्हणाली, "माफ करा. पण–"

"काय ?"

"मला आपली सही मिळेल काय ?"

चेहऱ्यावरची रेषा न हालवता 'माँटी'ने आतल्या खिशातून हेवुडने दिलेल्या फोटोंपैकी एक फोटो काढून तिच्या हातात ठेवीत थंड स्वरात म्हटले, "मला वाटतं यानं होईल तुझं समाधान."

त्या सुंदर ललनेशी तितक्या थंडपणाने व तुटकपणे वागणे जेम्सला भागच होते. कारण युद्धाच्या धबडग्यात बायकांनी लुडबूड करण्याबद्दलचा माँटीचा तिटकारा

सर्वख्यात होता. बायकोच्या मृत्यूनंतर आपल्या तळाच्या आणि कार्यालयाच्या परिसरात बायकांना त्याने सक्त मनाई केली होती. मॉंटीच्या दृष्टीने युद्ध हे खास पुरुषांचेच काम होते, आणि युद्धावर असताना सैनिकांनी ब्रह्मचर्य आचरणे ही त्याला आवश्यक साधना वाटत असे.

मोटारींचा काफिला विमानतळावरून बारा मैल दूर असलेल्या शहराकडे निघाला. या वाटेवर मॉंटीच्या हत्येचा प्रयत्न कदाचित केला जाईल असे मॉंटीच्या अमेरिकन शरीरसंरक्षकांना सांगण्यात आले होते. त्यामुळे त्यांनी मॉंटीच्या संरक्षणाची जय्यत तयारी केली होती. त्यातलाच एक भाग म्हणून त्यांनी मोटारी भरधाव सोडल्या होत्या.

जेम्स कर्नलशी बोलत होता. कर्नलला त्याचे खरे स्वरूप माहीत असले तरी त्या सुंदर स्त्री-ड्रायव्हरला अर्थातच ते माहीत नव्हते. तिच्यासाठी तरी मॉंटीसारखें बोलणे जेम्सला भागच होते. बोलताना एक भीती जेम्सला सतत वाटत होती. अचानक पिस्तुलाचा आवाज होईल आणि खिडकीची काच फोडून गोळी आपल्या मस्तकात घुसेल. आणि खरोखरच कसलातरी आवाज झाला. तत्क्षणी शरीर झोकून मोटारीत आडवे पडण्याचा मोह जेम्सला झाला. पण मॉंटीला ते विपरित दिसले असते म्हणून त्याने तो आवरला. त्याने पाहिले तो हवेत सर्वत्र टोळच टोळ पसरले होते. आणि त्या टोळधाडीतून त्याची गाडी भरधाव चालली होती. टोळ गाडीवर, काचांवर आपटत होते आणि त्याचा भीतिदायक आवाज होत होता !

वाटेवर दुतर्फा लोक जमा झाले होते आणि मॉंटीच्या नावाचा जयजयकार करीत होते. जेम्स सलाम करीत होता. हात हालवत होता. हसत होता.

पांढऱ्या दगडांच्या एका भव्य इमारतीसमोर मोटारी थांबल्या. जनरल विल्सनच्या कार्यालयाची इमारत होती ती. जेम्स मोटारीतून खाली उतरला आणि इमारतीत शिरला. त्याच्या मागे दार बंद झाले आणि आणखी एका नाट्यपूर्ण प्रसंगावर पडदा पडला.

जेम्सचे पुढील काही दिवस मोठ्या धामधुमीत गेले. विमानप्रवास, सलाम्या, स्वागत-समारंभ, युद्धाबद्दलची नाटकी चर्चा, जर्मन गुप्तहेरांच्या घडवलेल्या गाठीभेटी, लोकांनी केलेला बेहोष जयजयकार यांच्या भिरभिरत्या भोवऱ्यात जेम्स सापडला होता.

एका विमानतळावर ब्रिगेडियर हेवुडने जेम्सची, बोकडासारखी दाढी ठेवणाऱ्या एका गृहस्थाशी ओळख करून दिली होती. काळ्या रंगाचा सूट घातलेला आणि डोक्यावर भली मोठी हॅट चढवलेला हा पाहुणा, आधीची संपन्नता जाऊन विपन्नतेचा अनुभव घेणाऱ्या एखाद्या शोकान्त नाटकातील नायकासारखा दिसत होता. हेवुड म्हणाला, " यांचं नाव प्रोफेसर साल्वाडोर सेरिनी. आपल्याला भेटण्याची यांची फार फार इच्छा होती. पुराणवस्तुसंशोधक म्हणून ते अर्थातच सुप्रसिद्ध आहेत

पण शिवाय ते दोस्तहितैषी सच्चे इटालियनसुद्धा आहेत.

जेम्सच्या मनात एक क्षणभर असे येऊन गेले की हेवुड या प्रोफेसरमजकुरांची ओळख कशाला करून देतो आहे मुद्दाम ? पण त्यात हेवुडचा काही अंतस्थ हेतू असला पाहिजे हे त्याने ओळखले. त्यामुळ त्यांच्याशी थोडे बोलून जेम्सने त्यांना रजा दिली आणि तो हेवुडकडे वळून म्हणाला, " माझा निर्णय मी इतर जनरल्सना आणि मंत्रिमंडळाला कळवला आहे. ' ऑपरेशन टर्टल ' लगेच सुरू होईल. ' प्रोफेसरांच्या टवकारलेल्या कानांनी ' माँटी 'चे वाक्य अल्लद झेलले !

विमानाकडे जाताना जेम्सने एक हातरुमाल सहज खाली टाकला ! जेम्सचा अंदाज बरोबर होता. प्रोफेसर सेरिनी खरोखरीचा जर्मन हस्तक होता. पुराणवस्तु-संशोधनाच्या बुरख्याखाली त्याचे हेरगिरीचे काम चालू होते ! जेम्सने टाकलेला रुमाल प्रोफेसर सेरिनींना मृत्यूचा फासच ठरला.

उत्तर आफ्रिकेतील एका शहरात हेवुडने जेम्सची एका स्त्रीशी भेट घडवून आणली. त्या स्त्रीच्या पतीने फ्रेंच भूमिगत चळवळीत दोस्तांसाठी बहुमोल कामगिरी केली होती. पण पुढे तो गेस्टॅपोच्या हाती सापडला होता. त्यानंतर गेस्टॅपोने त्याच्या या बायकोला पकडून तिला हेरगिरीचे काम करण्यास सांगितले आणि ते नाकारल्यास नवऱ्याचे हाल हाल करून मारण्याची धमकी दिली. त्या स्त्रीने नाइलाजाने हेरगिरीचे काम पत्करले होते.

पन्नास वर्षांच्या त्या उंचनिंच, सावळ्या, पण देखण्या नीटनेटक्या स्त्रीची ' माँटी 'शी ओळख करून देण्यात आली. माँटीचे स्त्रियांबद्दलचे मत परिचित असल्यामुळे जेम्सने तिला सभ्यपणे पण तुटकपणे वागवले. त्यांचे संभाषण काही वेळ चालले आणि अचानक त्या स्त्रीचा स्वत:वरील ताबा सुटून, मोठमोठ्याने हुंदके देत ती युद्धाला आणि युद्धप्रमुखांना शिव्या देऊ लागली.

जेम्सचा गोंधळ उडाला. काय करावे ते त्याला सुचेना. तो हेवुडकडे वळला. हेवुडने त्या स्त्रीला उठविले आणि मोटारीपर्यंत जाण्यास मदत केली. ती स्त्री एकीकडे कमालीची देशाभिमानी होती आणि दुसरीकडे तिचे आपल्या पतीवर आत्यंतिक प्रेम होते. या दोन निष्ठांच्या रस्सीखेचीत तिच्या मनावरचा तिचा ताबा निसटला होता. हा एकच अपवादात्मक प्रसंग असा होता की त्याला तोंड देताना हेवुडचासुद्धा गोंधळ उडाला. त्या दोघांपैकी कोणीही पुन्हा कधी या विषयावर तोंड उघडले नाही.

दिवस जसजसे जाऊ लागले तसतसा जेम्स आपल्या भूमिकेशी इतका तद्रूप झाला की तो सर्व बाबतींत प्रति-माँटीच बनला. पडदा उघडलेला असताना तर तो ती भूमिका व्यवस्थित वठवीत होताच; पण पडद्याआड, एकटा असतानासुद्धा त्याला लेफ्टनंट क्लिफ्टन–जेम्ससारखे वागणे जमत नव्हते !

एकदा विमानात असताना हेवुड जेम्सजवळ आला. तळावर विमान उतरतच

होते. नवा प्रवेश सुरू होणार होता. हे जाणून हेवुडने सहज जेम्सला विचारले, 'काय जेम्स, भीती वगैरे नाही ना वाटत तुला ?"

जेम्सने खास माँटीच्या स्वरात ताडकन उत्तर दिले, "भीती ? आणि मला ? हेवुड, असा मूर्खासारखा प्रश्न पुन्हा विचारू नकोस."

"माफ करा." हेवुड पडेल स्वरात म्हणाला.

आपल्यावर चढलेला भूमिकेचा अंमल जेम्सच्या ताबडतोब लक्षात आला आणि त्याने हेवुडची माफी मागितली. तो पुढे म्हणाला, "हे विलक्षणच आहे म्हणायचं. रंगभूमीवरून बाजूला झाल्यावर नट सर्वसाधारणपणे लगेच आपली भूमिका विसरतो. पण माझ्या बाबतीत सारा उलटाच प्रकार. मी माँटीला विसरूच शकत नाही. फक्त झोपेत तेवढा मी माँटी नसतो; पण तेव्हादेखील मला माँटीचीच स्वप्नं पडत असतात."

"आलंय माझ्या लक्षात ते." हेवुड म्हणाला. "पण तुझ्या या कामगिरीवर तसं होणंच श्रेयस्कर आहे. कोणाचं कुठं आणि कधी तुझ्यावर लक्ष असेल ते सांगता येणार नाही."

जेम्स प्रत्यक्ष कामगिरीवर होता तेव्हा तेदेखील ठीकच होते. पण आता त्याची कामगिरी जवळ जवळ संपल्यातच जमा होती. आता त्याला माँटीचा विसर पडणे आवश्यक होते. माँटीचा पोशाख अंगावरून आणि त्याची भूमिका मनातून काढून टाकणे जरुरीचे झाले होते. पण दुर्दैव असे की त्याला आता जेम्स 'बनणे' कठीण झाले होते. माँटीने त्याचा संपूर्ण ताबा घेतला होता !

काही दिवसांनी, ठिकठिकाणी भेटी देऊन जेम्स जनरल विल्सनच्या अल्जियर्स-मधील मुख्य तळावर परतला होता. आपली कामगिरी त्याने अत्यंत चोख पार पाडली होती. हजारो लोकांनी माँटी म्हणून त्याचा जयजयकार केला होता. कित्येक मोठमोठ्या अधिकाऱ्यांनी त्याला जवळून पाहिला होता; पण त्यांतील एकालाही तो माँटी नाही असा संशय आला नव्हता. त्यामुळे शत्रूच्या हस्तकांना तसा संशय येणे शक्यच नव्हते.

पण डी-दिनाच्या मोहिमेला प्रत्यक्ष सुरुवात होईपर्यंत या तोतयाच्या कारस्थाना-बद्दल गुप्तता राखणे जरुरीचे होते. परिणामतः युद्धखात्याच्या वस्तुसंग्रहालयातील एका पुतळ्याचे स्वरूप जेम्सला आले होते. जनरल माँटगोमेरीशी तंतोतंत साम्य असलेला हा जिवंत पुतळा कोणालाही न कळता, गुप्तपणे अल्जियर्समधून हलवणे भाग होते. त्या पुतळ्याचे माँटीशी असलेले बाह्यांग साम्य एवढीच या बाबतीत धोक्याची गोष्ट नव्हती; तर आपण माँटीच आहोत असे त्या पुतळ्याला अजूनही वाटत होते आणि त्यामुळे त्याच्या वागण्याने संशय उत्पन्न होण्याचा महाभयंकर धोका होता !

[अपूर्ण]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

४ ते १० मे राशि-भविष्य

**मेष :** फारशी धावपळ धडपड न करता सहजसुलभ यश – जगाने हेवा करावा असे यश – या वेळी तुमच्या पदरी टाकावे अशीच या वेळच्या ग्रहस्थितीची इच्छा दिसते. साडेसातीचा क्षण ओसरेल, यशस्वी कार्यक्षेत्र दृष्टिक्षेपात येईल, सांपत्तिक मोठे लाभ, राजकीय प्रतिष्ठा, सामाजिक लोकप्रियता याही गोष्टी फारसा प्रयत्न न करता पदरी पाडून घेता येतील. चंद्र-मंगळ त्रिकोण घडताच (९ मे) माझ्या या म्हणण्याचा आपणास हातोहात प्रत्यय यावा.

या आठवड्यात दूरचा प्रवास घडेल, प्रियजनांच्या भेटीगाठी होतील, नोकरी-धंद्यात अपेक्षेबाहेर लाभ उठवू शकाल.

रासायनिक द्रव्ये, सौंदर्य प्रसाधने, परप्रांतीय वस्तू – अशा व्यवहारात तर आजवर कधीही न मिळालेला लाभ पदरी पडावा.

दि. ८ ते १० अपेक्षासाफल्याचे दिवस.

**वृषभ :** व्ययस्थ मंगळाचा धिंगाणा संपला. आता हायसे वाटेल. प्राप्तीत वाढ होण्याची शक्यता कमीच – पण अनावर खर्चाला पायबंद घालण्यात यशस्वी झालात हे काय कमी आहे ? या आठवड्यापासूनच हरवलेले स्वास्थ्य गवसण्याची शक्यता दिसू लागेल, विचारांना अनुकूल कलाटणी मिळेल, आज ना उद्या आपले ईप्सित साध्य करू अशी आशा वाटू लागेल. आगामी सूर्य–हर्षल त्रिकोण हे एक अंतरिक्षीय ग्रहांनी प्रसन्न मनाने दिलेले वरदानच ठरेल. त्या भविष्यकालीन प्रगतीची प्रसाद चिन्हे या आठवड्यापासूनच दिसायला लागतील.

वृत्तपत्र व्यवसाय, ग्रंथलेखन, कलाक्षेत्रात पदार्पण इ. अनेक गोष्टी या कालापासूनच मूळ धरू लागतील.

दि. ४, ८, १० या दिवसांची नोंद करा.

**मिथुन :** १९ जून १९६८ ला अंतरिक्षातील एक विशाल तेजोगोल पृथ्वीवर आदळणार आहे आणि आपल्या पृथ्वीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडणार आहेत ही वृत्तपत्रीय बातमी ऐकल्यापासून तुमची झोप उडाल्यासारखी झाली असेल. पण मी सांगतो – आपण मुळीच काळजी करू नका. तसं काही घडणार नाही. तो ग्रह पृथ्वीच्या रोखाने वेगाने वाटचाल करीत आहे ही गोष्ट खरी आहे. पण तो पृथ्वी-

पासून २०।२२ लक्ष मैल अंतरावरून पुढे निघून जाणार असल्यामुळे तुम्हाला या भयानक घटनेची धास्ती राखण्याचे मुळीच कारण नाही. त्या काली वादळे होतील, प्रचंड झंझावात उठतील.

आपणास सध्या १२ वा मंगळ असला तरी असलं काही भयंकर घडणार नाही. सांपत्तिक ताण थोडाफार वाढेल इतकेच.

दि. ७ ते ९ काहीसे अनुकूल ग्रह.

**कर्क :** कालचक्र गतिमान आहे. प्रतिकूलतेनंतर अनुकूलता यायचीच. माझ्या म्हणण्याचा प्रत्यय या आठवड्यातच येऊ शकेल.

मंगळ लाभस्थानी तर अनेक समर्थ ग्रह भाग्य दशमस्थानी. ही ग्रहस्थिती तुमच्या प्रत्येक कार्यात नेत्रदीपक यश देऊन जाईल. हवं ते घडवून आणील.

ग्रहांनी अनुकूल कौल दिलाच आहे, थोडासा प्रयत्न केलात तर अपेक्षेबाहेर लाभ उठवू शकाल.

नजीकच्या भविष्यकालात घडून येणाऱ्या आत्यंतिक प्रगतीच्या घटना या आठवड्यापासूनच अंकुरण्याला लागतील.

हा साराच आठवडा खूपच घाईगर्दीचा, धावपळीचा जाणवेल, आपले हेतू मात्र त्यामुळे निश्चित सफल होतील.

दि. ८, ९, १० या वेळी रेंगाळलेल्या कामांना गती मिळेल.

**सिंह :** आजवर शनि-राहूंच्या दाबाखाली आपण दबून गेला होता. सूर्य-मंगळांच्या स्थित्यंतरांमुळे ती अवस्था आता संपलेली आहे. आता आणि यापुढेही सिंहराशी व्यक्ती सतत आघाडीवर राहाव्यात अशीच ग्रहांची सदिच्छा दिसते आणि ती त्यांची इच्छा पूर्णांशाने सफल होण्याची लक्षणे या आठवड्यापासूनच दिसायला लागतील.

तुमच्या जीवनातील प्रतिज्ञेने यश मिळविण्याचा काल हाच.

आगामी सूर्य-हर्षल त्रिकोणात तर तुमची प्रतिष्ठा उंचावेल असे सामर्थ्य साठविलेले आहे. यांत्रिक व्यवहारांत – परराष्ट्रीय आयात–निर्यात धंद्यात या महिन्यापासून प्रचंड उलाढाली घडून याव्यात. स्थावराची काळजी मिटेल, वाहनाची समस्या सुटेल, नव्या व्यवसायक्षेत्रात पाऊल पडेल.

दि. ८ ते १० व्यावसायिक महत्त्व वाढीस लागेल.

**कन्या :** मंगळ भाग्यस्थानी आलाच आहे–सूर्यही लवकरच येणार आहे. तुमचा अनिष्ट काल आता इतिहासजमा झालाय. अपेक्षित प्रगती दृष्टिक्षेपात यायला लागेल. हुकलेल्या संधी पुन्हा भेटायला लागतील. वरिष्ठांची कृपादृष्टी वळू लागेल. आणि वैचारिक संघर्ष मिटून सर्वत्र प्रसन्न व आशादायक वातावर दिसायला लागेल.

उद्योगधंद्यात प्रगतीची लक्षणे याच आठवड्यापासून दिसू लागतील, दलाली व्यवहार, आयात–निर्यात व्यापार यांशी आपला संबंध असेल तर तुमचे भाग्य उजळून निघेल.

वाहनापासून काही दिवस जपून राहा. ते कोणत्याही क्षणी रागावेल.

दि. ४ ते ७ या काळी आपल्या साऱ्या योजना गती घेऊ लागतील.

तूळ : मंगळाचे अष्टम स्थानातून संचलन सुरू आहे. तो सप्तमातून अष्टमात गेल्याने तुमच्या वातावरणात काहीच बदल होण्यासारखा नाही. सांसारिक व व्यावसायिक व्यथा–विवंचना त्याच अनुभवाव्या लागतील. अकराव्या गुरूमुळे एवढेच घडेल की, कसेही कठीण प्रसंग आले तरी त्यातून निभावून जाल. प्रतिष्ठेला धक्का चुकूनही लागू शकणार नाही.

दूरचा प्रवास टाळा आणि फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका. व्यावसायिक संघर्ष निर्माण होऊ नयेत म्हणून सतत मिळते जुळते घेण्याची प्रवत्ती ठेवा. ते दिवस काहीसे शांततेनेच काढायला हवेत.

दि. ७ ते ९ काहीसे अनुकूल दिवस.

वृश्चिक : मंगळाच्या राश्यंतराने परिस्थितीचा ताण अधिकच वाढू लागलेला आहे. व्यावसायिक क्षेत्रात वादविवाद–संघर्ष याला अगदी ऊत येईल, पदोपदी खटकू लागेल. कुठेच सहानुभूतीचे वातावरण दिसेनासे होईल. कौटुंबिक अनारोग्याचीही त्यात भर पडेल.

सांपत्तिक बाबतीत मात्र फारशी चिंता करण्याचे कारण नाही. हर्षलची तुमच्यावर पूर्ण कृपा असल्यामुळे तो तुमचे सहसा कशातच नडू देणार नाही.

आगामी १५-२० दिवस शांततेने काढायला हवेत. निष्कारण पाण्यात पाहणारा वर्ग निर्माण होईल. गुप्त शत्रूंची कारस्थाने वाढू लागतील, त्यांचे डावपेच उधळून लावण्याइतके चातुर्य तुमच्या ठिकाणी असल्यामुळे – प्रत्यक्षात अनिष्ट असे काहीच घडणार नाही.

दि. ४,५,८,१० या कालात अनेक कामे झटपट आवरावी लागतील.

धनू : गुरू भाग्यस्थानी आहे तोपर्यंत तुम्हांला कुणाचीही डर नाही. शनि-राहूंनी बरीच कारस्थाने केली पण शेवटी ती त्यांच्याच अंगाशी आली. निर्धार हे ज्याचे ब्रीद – अविश्रान्त परिश्रम हा ज्याचा स्थायी भाव – त्यांना कोणीच काही करू शकत नाही.

सध्या तर बरीचशी ग्रहरचना आपणास अनुकूल आहे. व्यावसायिक प्रश्न भराभर सुटू लागतील, वाढत्या जबाबदाऱ्या आपण यशस्वी करू शकू असा आत्मविश्वास निर्माण होऊ लागेल. समाजातील प्रतिष्ठेचे स्थान आपण जिद्दीने टिकवू शकू अशी खात्री वाटू लागेल.

आगामी ८ १५ दिवसांतच अनंत महत्वपूर्ण घटना भराभर घडून यायला लागतील.

दि. ७,८,९ या काली धावपळीने अनेक कामे हातावेगळी करावी लागतील.

**मकर :** चौथ्या मंगळाची कारकीर्द संपलीच आहे. सूर्यही तेथून लवकरच पुढे निघण्याच्या विचारात आहे. गेल्या महिन्यातील बऱ्याचशा व्यथा–विवंचना आता मिटतील, सांपत्तिक पेचप्रसंगही सुटण्याला लागतील.

अनिष्ट काळातही आपण आपले महत्त्व आणि माहात्म्य कायम ठेवलेत यांतच तुमच्या असीम कर्तृत्वाचे दर्शन घडते.

आगामी सूर्य–हर्षल त्रिकोण (१६ मे) तर तुमच्या हातून असं काही महत्तम कार्य घडवून आणील की, त्यामुळे तुमच्या व्यक्तिमत्त्वासभोवार तेजोवलय दिसू लागेल.

तुमचे कोणतेही कार्यक्षेत्र असो ते प्रगतीकडे वेगाने वाटचाल करू लागेल.

दि. ८,९,१० विशेष स्मरणात ठेवण्यासारखा काल हाच.

**कुंभ :** नाही म्हटले तरी चौथ्या मंगळाची थोडीफार तरी बाधा झाल्याशिवाय राहात नाही. अनारोग्याची विवंचना तर कधी सांपत्तिक ताण असे काही प्रकार मधून मधून अनुभवावे लागतीलच.

पण निर्धारनिष्ठेचे व्रत आचरणाऱ्यांना अशा अनिष्टतेची क्षिती बाळगण्याचे कारणच नाही. आजवर असे प्रसंग अनेक आले आणि ते सारे आपण पचवलेही.

सध्याचे ८-१५ दिवस आपण कांहीसे जपून काढलेत की, अनिष्ट काल पुढे तुमच्या वाटेसही फिरकणार नाही.

दूरचा प्रवास करण्याच्या भानगडीत पडू नका. व्यवसाय–धंद्यात बदल घडवून आणण्याचे विचार डोक्यात आणू नका.

दि. ६ ते ८ या काली अपेक्षित कार्यात यश लाभावे.

**मीन :** या वेळची ग्रहरचनाच अशी आहे की, आपण आपली साडेसाती या काळापुरती विसरू शकता.

मंगळासारखा समर्थ ग्रह पराक्रमात म्हणजे सर्व काही. तो तुमच्या कार्याचा वेग वाढवील, सारी स्थगित कार्ये गतिमान करील.

आगामी १५–२० दिवस आपणास फारच घाईगर्दीचे जाणवतील. अनेक कार्ये हातावेगळी करावी लागतील, कलासाहित्याच्या क्षेत्रात हिरिरीने भाग घ्यावा लागेल, आणि या सर्व क्षेत्रातील यश झगडून मिळवावे लागेल.

रासायनिक खते, धान्योत्पादन, वैद्यकीय व्यवसाय – यांमध्ये आपण नेत्रदीपक यश मिळवाल.

दि. ४,६,८,९ हे दिवस अपेक्षासाफल्याचे जाणवतील.

○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649


## राष्ट्रीय पंचांग

**शके १८९० साठी (१९६८।६९)**

**किंमत ५० पैसे दर प्रतीमागे**

□

[ भारत सरकारने पुढील १२ भाषांत प्रसिद्ध केलेले : इंग्लिश, संस्कृत, हिंदी, उर्दू, बंगाली, उडिया, तेलगु, तमिळ, मल्याळी, कानडी, मराठी व गुजराती ]

□

राष्ट्रीय पंचांग हे शक कालगणनेप्रमाणे असणाऱ्या भारतीय राष्ट्रीय दिनदर्शिकेवर आधारीत आहे. या पंचांगाचा उद्देश आपल्या देशातील निरनिराळ्या नागरी दिनदर्शिकांत एकरूपता घडवून आणणे हा आहे. खगोलशास्त्राप्रमाणे सूर्यचंद्राच्या अचूक स्थान-गणनेवर या पंचांगातील तिथी, नक्षत्रे व योग इ.ची गणिते तयार करण्यात आली आहेत. यामुळे या पंचांगात दर्शविलेले बदल मिनिटापर्यंत अचूक आहेत. या राष्ट्रीय पंचांगात एखाद्या उत्कृष्ट पंचांगात हवी असलेली सर्व महत्त्वाची आणि जरुरीची माहिती देण्यात आलेली आहे. हे पंचांग ज्योतिषी, पंचांगकर्ते व सामान्य नागरिक यांनी रोजच्या वापरासाठी घ्यायलाच हवे असे आहे.

**मिळण्याची ठिकाणे –**

१. मॅनेजर ऑफ पब्लिकेशन्स, सिव्हिल लाईन्स –दिल्ली ६
२. दि डायरेक्टर, रिजनल मेट्रॉलॉजिकल सेंटर,
नॉटीकल अलमनॅक युनिट, अलिपूर–कलकत्ता २७
३. सर्व प्रमुख शहरांतील भारत सरकारचे प्रकाशन–विक्रेते


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून,४१९,